सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. १८ नोव्हेंबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक २२२ | पाने : ८ | किंमत रु. ६/-

## थोडक्यात...

### मुंबईत सीएनजी टंचाई, रिक्षा-टॅक्सी वाहतूक ठप्प; प्रवास कोलमडणार

मुंबई : वडाळा परिसरातील गेल गॅसच्या मुख्य पाईपलाईनमध्ये आलेल्या तांत्रिक बिघाडाचा मोठा फटका मुंबईकरांना बसला आहे. रविवारी दुपारपासून सीएनजीचा पुरवठा अचानक बंद झाल्यामुळे शहरातील अनेक सीएनजी पेट्रोल पंपांवर गॅस उपलब्धच झाला नाही. परिणामी मुंबई, उपनगर, ठाणे आणि नवी मुंबईतील बहुतांश पंपांवर सीएनजी पूर्णपणे संपली असून वाहनचालकांची मोठी गैरसोय झाली आहे. रविवार पुरता मर्यादित असलेला हा तुटवडा सोमवारी सकाळी आणखी तीव्र झाला. आठवड्याच्या पहिल्या दिवशी कामावर जाण्यासाठी घरातून निघालेल्या नागरिकांना रिक्षा आणि टॅक्सींची मोठी कमतरता जाणवू लागली. सीएनजी उपलब्ध नसल्याने अनेक वाहनचालकांनी सकाळपासून गाड्या रस्त्यावर आणण्यास टाळाटाळ केल्याने सार्वजनिक वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसह कार्यालयीन प्रवाशांना रस्त्यावरच दीर्घ प्रतीक्षा करावी लागली. काही पंपांवर गॅस येण्याच्या शक्यतेने वाहनांच्या मोठ्या रांगा लागल्या असल्या तरी तुटवडा कायमच राहिल्याने लोकांची चिंता वाढली आहे. पाईपलाईन दुरुस्तीचे काम सुरू असून पुरवठा पूर्ववत होण्यासाठी काही काळ लागू शकतो, अशी प्राथमिक माहिती मिळत आहे.

### जामनेर नगराध्यक्षपदासाठी मंत्री गिरीश महाजन यांच्या पत्नी रिंगणात!



जामनेर : राज्यातील तब्बल २४६ नगरपरिषद आणि ४२ नगरपंचायतींसाठी २ डिसेंबरला मतदान होणार आहे त्याच अनुशंघाने नगरपरिषद आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. जामनेरच्या नगराध्यक्ष पदासाठी मंत्री गिरीश महाजन यांच्या पत्नी तसेच भाजपच्या उमेदवार साधना महाजन यांनी आज कार्यकर्त्यां समवेत शक्ती प्रदर्शन करत मोठ्या जल्लोषात उमेदवारी अर्ज दाखल केला. दरम्यान अर्ज भरल्यानंतर माध्यमांशी संवाद करतेवेळी शहरात आम्ही अनेक विकास कामे केली आहेत तसेच अपूर्ण राहिलेले कामे पूर्ण करण्यासाठी आम्हाला पुन्हा जनतेने संधी दिली की, सगळी कामे आम्ही त्वरित पूर्ण करू. तसेच विरोधकांची आव्हाने आम्ही पेलवणार कारण आमच्याकडे विकासाचे मुद्दे आहेत तसेच राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या रूपाने उत्तम नेतृत्व आहे. त्यांच्या मार्फत शहराचा विकास करण्यासाठी जास्तीत जास्त निधी कसा आणता येईल यासाठी नेहमीच प्रयत्न करू असे आश्वासनही दिले.

### पुण्यात भरदिवसा तरुणाचा खून

पुणे : गेल्या काही दिवसांपासून पुणे शहरात गुन्हेगारीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, येथील कायदा आणि सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शहरात एकापाठोपाठ एक अनेक हत्याकांड घडले आहेत, ज्यात काही ठिकाणी भरदिवसा खून झाल्याचे धक्कादायक प्रकार समोर आले आहेत. या सर्व हत्यासत्रामुळे पुणे शहरातील कायदा आणि सुव्यवस्था रसातळाला गेल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून आणि नागरिकांकडून केला जात आहे. या गंभीर परिस्थितीत, आता पुण्यात आणखी एक धक्कादायक घटना घडली आहे. शहरातील सिंहगड कॉलेज परिसरात भरदिवसा एका व्यक्तीची हत्या करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. घडल्या प्रकाराची माहिती मिळताच पोलीस यंत्रणा तात्काळ घटनास्थळी दाखल झाली आहे आणि या प्रकरणाचा अधिक तपास सुरू करण्यात आला आहे. मात्र, शहरात दिवसाढवळ्या घडणाऱ्या या हत्यांकांडामुळे पोलीस यंत्रणा नेमके काय करत आहे? आणि कायद्याचा धाक राहिलेला नाही, असा दावा नागरिक उघडपणे करत आहेत. या ताज्या हत्याकांडामुळे पुणे शहरात सध्या तणावाची स्थिती निर्माण झाली असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

### महाराष्ट्रात थंडीची लाट; हवामान विभागाचा ताजा अंदाज!

मुंबई : राज्यातील बहुतांश भागात थंडीचा जोर वाढत असल्याचे हवामान विभागाच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमानात सातत्याने घसरण होत असून थंडीची लाट पसरत चालली आहे. हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, मुंबई, पुणे, कोकण, मराठवाडा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात पुढील आठवडाभर थंडीचा कडाका कायम राहणार आहे. वाढत्या थंडीमुळे ग्रामीण भागांसह शहरांमध्येही लोकांनी शेकोट्या पेटवून ऊब मिळवण्याचे चित्र दिसत आहे. याशिवाय, राज्याच्या उत्तर महाराष्ट्रापासून मराठवाड्यापर्यंत तापमानात आणखी लक्षणीय घट होण्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. त्यामुळे सकाळ-संध्याकाळी गारठा अधिक वाढण्याची शक्यता असून नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यात निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापत असले, तरी हवामान मात्र उलट चित्र दाखवत आहे. अनेक भागांत थंडीचा कडाका जाणवू लागला असून तापमानात सतत घट होत आहे.

## भारत-चीन संबंधांमध्ये सकारात्मक बदल; लष्करप्रमुखांनी दिली महत्वाची माहिती

नवी दिल्ली : भारत-चीन सीमावर्ती तणावाबाबत गेले काही महिने सकारात्मक घडामोडी घडत असल्याचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी स्पष्ट केले. दोन्ही देशांतील राजकीय आणि लष्करी स्तरावरील संवाद वाढल्यामुळे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील परिस्थितीत हळूहळू सुधारणा जाणवत आहे.

मागील एका वर्षात पूर्व लडाखमधील एलएसीवर वातावरणात मोठा सकारात्मक बदल दिसून आला आहे. ऑक्टोबर २०२४ पासून भारत-चीनमधील व्यापक राजकीय चर्चांमुळे परस्पर समन्वय अधिक प्रभावी झाला आहे. जेव्हा राजकीय मार्गदर्शन स्पष्ट असते, तेव्हा त्याचा फायदा सैन्यदलांनाही होतो, असे जनरल द्विवेदी यांनी सांगितले.

मागील वर्षभरात सीमारेषेवर १,१०० बैठकांचे आयोजन झाले, म्हणजे जवळजवळ रोज तीन बैठका.



पूर्वी चर्चा फक्त कॉर्प्स कमांडर स्तरावर होत असत, परंतु आता संवादाचा स्तर खाली आणून बटालियन आणि कंपनी कमांडरपर्यंत वाढवण्यात आला आहे. त्यामुळे अनेक तांत्रिक किंवा क्षेत्रीय प्रश्न स्थानिक स्तरावरच सुटतात आणि वरीष्ठ पातळीवर पोहोचण्याची गरज पडत नाही, असेही जनरल द्विवेदी यांनी सांगितले.

जरी महत्त्वपूर्ण निर्णय उच्चस्तरीय बैठकीतच घेतले जातात, तरीही स्थानिक अधिकाऱ्यांच्या संवादामुळे दोन्ही बाजूंमध्ये अधिक लवचिकता निर्माण झाली आहे. चीनला जर कोणतेही बांधकाम करायचे असेल तर ते आगाऊ कळवतात. भारतीय बाजूकडून हरकत नोंदवल्यास ते बांधकाम तत्काळ थांबवतात किंवा हटवतात. सीमेवर परस्पर सहकार्य समाधानकारक स्तरावर आहे, असे जनरल द्विवेदी म्हणाले.

मणिपूरमध्ये पुन्हा स्थैर्य परत येत असल्याचे जनरल द्विवेदी यांनी सांगितले. लोकांचा आत्मविश्वास वाढताना दिसत असल्याने, आगामी काही दिवसांत सर्व काही सुरळीत राहिले तर राष्ट्रपती मणिपूरचा दौरा करण्याची शक्यता आहे. समुदायांमध्ये संवाद वाढला तर बदल आणखी गतीने घडेल, असेही जनरल द्विवेदी म्हणाले.

शेजारी राष्ट्रांमधील अस्थिरतेचा भारतावर परिणाम होतो. म्यानमारमधून आलेल्या निर्वासितांची भारत काळजी घेत आहे आणि त्यांनी स्वेच्छेने आपल्या देशात परतावे अशी अपेक्षा आहे. परंतु दहशतवादी गटांनी अनियंत्रित भूभागाचा वापर भारताविरुद्ध करण्याचा प्रयत्न केल्यास ते कोणत्याही परिस्थितीत मान्य होणार नाही, आणि त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असे जनरल द्विवेदी यांनी ठामपणे सांगितले.

## 'भाजप काँग्रेसचा सर्वाधिक आमदारांचा विक्रम मोडणार'

नवी दिल्ली : बिहार विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या घवघवीत यशानंतर, देशभरात भाजपच्या आमदारांची संख्या वाढली आहे. भाजपला मिळालेल्या आमदारांची ही आतापर्यंतची मोठी संख्या आहे. देशभरातील विविध राज्यांमध्ये विधानसभेच्या जागा जिंकून भाजपने आपले स्थान सातत्याने मजबूत केले आहे. पक्षाचे नेते अमित मालवीय यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर शेअर केलेल्या पोस्टमध्ये भाजपच्या चढत्या आलेखाबद्दल माहिती दिली. पुढील दोन वर्षांत भाजपच्या देशभरातील आमदारांची एकूण संख्या १८०० च्या पुढे जाण्याची शक्यता आहे, असा विश्वास अमित मालवीय यांनी व्यक्त केला. देशात इंदिरा गांधींची लाट होती त्या काळात १९८५ मध्ये काँग्रेसने २०१८ आमदारांचा टप्पा गाठला होता. ही देशातल्या काँग्रेस आमदारांची सर्वोच्च संख्या होती. हा विक्रम एक दिवस भारतीय जनता पार्टी नक्की मोडीत काढेल, असाही विश्वास अमित मालवीय यांनी व्यक्त केला.

भाजप आमदारांची संख्या कशी वाढली ? भारतीय जनता पार्टीच्या आमदारांच्या संख्येत २०१४ पासून वाढ होत आहे. या संदर्भातली आकडेवारी भाजपच्यावतीने जाहीर करण्यात आली आहे. भाजप आमदारांची संख्या २०१४ मध्ये १,०३५ होती. नंतर २०१५ मध्ये ९९७, २०१६ मध्ये १,०५३ आणि २०१७ मध्ये १,३६५ अशी लक्षणीय वाढ झाली. त्यानंतर २०१८ मध्ये ही संख्या १,१८४, २०१९ मध्ये १,१६० आणि २०२० मध्ये १,२०७ झाली. यानंतर २०२१ मध्ये १,२७८ आमदार, २०२२ मध्ये १,२८९, २०२३ मध्ये १,४४१, २०२४ मध्ये १,५८८ आणि आता २०२५ मध्ये १,६५४ आमदारांसह वाढीचा कल कायम आहे

## फाशीच्या शिक्षेवर बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीनांची प्रतिक्रिया

ढाका - बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना युनुस सरकारने स्थापने केलेल्या आंतरराष्ट्रीय गुन्हे प्राधिकरणाने मोठा दणका दिला आहे. बांग्लादेशमध्ये ऑगस्ट २०२४ मध्ये हिंसाचार उफाळला होता. यादरम्यान हसीना यांनी निशस्त्र आंदोलकांवर गोळीबार करण्याचा आदेश दिल्याचा आरोप होता. याच प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान हसीना यांनी 'मानवतेविरूद्ध गुन्हा' केल्याचे म्हणत प्राधिकरणाने हसीना यांना दोषी ठरवले आहे. त्यांना थेट मृत्यूदंडाची (फाशीची) शिक्षा सुनावण्यात आली आहे. यावर आता शेख हसीना यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी प्राधिकरणाने त्यांच्यावर केलेले आरोप फेटाळले आहेत.

शेख हसीना म्हणाल्या की, त्यांना किंवा त्यांच्या आवामी लीग पक्षाला बाजू मांडण्याची योग्य संधी प्राधिकरणाने दिलेली नाही.



यासोबतच त्यांनी प्राधिकरणावर पक्षपातीपणाचा आरोपही केला आहे. प्राधिकरणाने विद्यमान प्रशासनासाठी सार्वजनिकरित्या सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न केला आहे, असा गंभीर आरोप हसीनांनी केला आहे. हसीना पुढे म्हणाल्या, 'आंतरराष्ट्रीय गुन्हे प्राधिकरणात (खउढ) माझ्याविरोधात करण्यात आलेले सर्व आरोप मी फेटाळून लावते. गतवर्षी जुलै ऑगस्ट मध्ये राजकीय विभाजनात दोन्ही बाजूंनी झालेल्या सर्व मृत्यूंसाठी मी शोक व्यक्त करते. यादरम्यान मी किंवा पक्षाच्या कोणत्याही नेत्याने आंदोलकांना मारण्याचे आदेश दिले नव्हते.'

## नागपुरात शिवसेना स्वबळावर लढणार, भाजपचे मौन!

नागपूर : नेत्यांच्या निवडणुकीत कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केल्यानंतर आता कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडल्याची नाराजी अनेक जण व्यक्त करत आहे. सोमवार, १७ नोव्हेंबर हा उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता .

इच्छुक उमेदवारांना चर्चेत गुंतवून शेवटपर्यंत रस्सीखेच करून अखेर जिल्ह्यात जवळपास महायुती तुटली आणि मविआघाडीत बिघाडी झाली. महायुतीत शिवसेनेने सर्व नगराध्यक्ष व नगरसेवक पदाचे उमेदवार घोषित केले. भाजपकडून संबंधितांना तशा सूचना दिल्या गेल्या. राष्ट्रवादी अजित पवार गटाचा अपेक्षाभंग झाला. राष्ट्रवादीने शेवट पर्यंत प्रतीक्षा केली. ठाकरे गटाला कुठेही स्कोप मिळाला नाही. परिणामी, आता सर्वच पक्ष एकमेकांविरुद्ध निवडणुकीच्या रिंगणात उभे ठाकले आहेत, असे चित्र जवळजवळ स्पष्ट आहे.

नेत्यांच्या निवडणुकीत कार्यकत्यांनी जीवाचे रान केल्यानंतर आता कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडल्याची नाराजी अनेक जण करत आहेत. सोमवार, १७ नोव्हेंबर हा उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस होता फार फार तर नगराध्यक्षपदाचे उमेदवार अधिकृत होतील. नगरसेवकाबद्दल अद्यापही साशंकताच आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत विजय मिळावा, यासाठी मताचे एकत्रित समीकरण करून बड्या नेत्यांनी त्यांची राजकीय जमीन सुपीक केली. आता कार्यकर्त्यांची वेळ आल्यानंतर तुम्ही तुमचे पाहून घ्या, आम्ही कायम तुमच्या सोबत आहोत, अशी भूमिका घेत सर्वच राजकीय पक्षांनी शेवटपर्यंत कार्यकर्त्यांना रखडवत ठेवल्याचे दिसून येत आहे. त्यातही अनेक पक्षांनी आपलीच हवा असल्याचा दावा करीत नेत्यांच्याही पुढे २ पावले टाकून विजय पक्का! असे चित्र निर्माण केल, त्यामुळे आता सर्वच नेते हतबल दिसत आहे.

भारतीय जनता पक्ष भाजपचे जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत यांच्याशी अनेकदा संपर्क करण्यात आला. महायुतीबाबत काय, यावर त्यांची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला, मात्र, सातत्याने संपर्कानंतरही त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

शिवसेना आमचे सर्व उमेदवार ठरले आहेत. २७ नगराध्यक्षपदाचे तसेच नगरसेवकपदांचे उमेदवारही तयार आहेत. संबंधितांना एबी फॉर्मही दिले. पक्षनेतृत्वाला याची माहिती दिली, यादीतील उमेदवारांची नावे सोमवारी जाहीर करू. -आ. कृपाल तुमाने, संपर्कप्रमुख, रामटेक लोकसभा

राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीसाठी प्रयत्न केले, चर्चाही केली. मौद्यात शिवसेना शिंदे गटासोबत काही जागांवर निर्णय झाला आहे. भाजपकडून प्रतिसाद मिळत नाही. चर्चा सुरूच आहे. परंतु इच्छुकांचा आग्रह वाढला आहे. -डॉ. राजाभाऊ टांकसाळे, जिल्हाध्यक्ष, राकाँ अजित पवार गट

शिवसेना उबाठा ८८ महाविकास आघाडीबाबत चर्चा सुरू आहे. जागावाटपावर चर्चा केली जात आहे. काँग्रेस किती जागा सोडेल, त्याबाबत जाणून घेतले जात आहे. जागेचा तिढा सुटू शकेल. -उत्तम कापसे, जिल्हाप्रमुख, (ठाकरे गट)

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ८८ पक्षाने स्थानिक पातळीवर अधिकार दिले आहेत, स्थानिक नेते त्यांना आवश्यक ते निर्णय घेऊ शकतात, पक्षनेतृत्वाने तशा सूचना केल्या आहेत. प्रत्यक्ष परिणामाची जाण त्यांना असते. -अश्विन बैस, जिल्हाध्यक्ष

राष्ट्रवादी शरद पवार गट ८८ राष्ट्रवादीला आपाठी हवी होती, तशी चर्चाही केली. परंतु समाधान न झाल्याने इतर समविचारी पक्षाला सोबत घेतले. उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. - प्रवीण कुटे पाटील, जिल्हाध्यक्ष

## मानव-बिबट संघर्ष कमी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करा
## केंद्र सरकारकडून बिबट नसबंदीची मान्यता-वनमंत्री गणेश नाईक

पुणे, दि. १७: मानव-बिबट संघर्ष कमी करण्यासाठी प्रस्तावित कामांकरिता लागणारा निधी व त्याकरिता प्रस्तावाची मागणी तात्काळ सादर करावी, तसेच कृत्रीम बुद्धीमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर व जागतिक स्तरावरील सर्व उपाययोजना अंमलात आणाव्यात, बिबट नसबंदीबाबत केंद्राची मान्यता प्राप्त झाली असून त्याबाबतची कार्यवाही करावी, अशा सूचना वनमंत्री गणेश नाईक यांनी दिल्या.

वनसंरक्षक (प्रादेशिक) यांच्या सभागृहात मानव-बिबट संघर्ष उपाययोजनांबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. सामाजिक वनीकरणाचे प्रधान मुख्य वनसंरक्षक विवेक खांडेकर, मल्लिकार्जुन,मुख्य वनसंरक्षक, नाशिक, आशिष ठाकरे, वनसंरक्षक पुणे वनवृत्त महादेव मोहिते, उपवनसंरक्षक पुणे, प्रशांत खाडे, उपवनसंरक्षक जुन्नर, श्रीधर्मबीर सालचिठठल, उपवनसंरक्षक अहिल्यानगर, विवेक होशिंग,



उपवनसंरक्षक वन्यजीव जयरामगौडा, उपवनसंरक्षक शिक्षण कुलराज सिंह, उपवनसंरक्षक सोलापूर सिध्देश सावडेकर उपवनसंरक्षक नाशिक, पंकज गर्ग उपवनसंरक्षक सामाजिक वनीकरण यांच्यासह वनअधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

श्री. नाईक यांनी नाशिक मधील वनकर्मचारी यांच्यावर झालेल्या बिबट हल्लाप्रकरणी संबंधित वनकर्मचारी यांची भेट घेऊन त्यांचे मनोबल वाढविले. मानव-बिबट संघर्षाबाबत वनकर्मचारी स्वतःचा जीव धोक्यात घालून काम करीत आहेत, त्यांना आवश्यक ते सर्व साहित्य पुरविण्यात यावे. जिल्हा योजनेमधून आकस्मिक निधी त्वरीत उपलब्ध करुन देण्याबाबतचा पाठपुरावा करण्यात येत आहे. बांबू लागवड करुन बिबटला अटकाव करता येईल किंवा कसे याबाबत अभ्यास करावा , अशा सूचना श्री. नाईक यांनी दिल्या.

श्री. खांडेकर यांनी बैठकीत ऊस शेती, बिबट अधिवास व त्याकरीता प्रभावी उपाययोजनांबाबत माहिती दिली. यामध्ये साखर कारखान्यांनी करावयाची कार्यवाही, टायगर फाऊंडेशनवर आधारित नियोजन तसेच बिबट्यांची गणना करणे, बिबट्यांचे मायक्रोमॅपिंग, पोल्ट्री वेस्ट तसेच हॉटेल वेस्टची विल्हेवाट, रेस्क्यू सदस्यांचा विमा काढणे, बेस कॅम्पचे सक्षमीकरण करणे, कुरण विकास करून बिबट्यांकरीता अधिवास तयार करणे, मेंढपाळ, ऊस कामगार आदीकरिता विविध उपाययोजना करण्याबाबत चर्चा करण्यात आली. श्री. खाडे यांनी मानव-बिबट संघर्षाबाबत केलेल्या उपाययोजनाबाबतचे सादरीकरण केले. तर श्री. मोहिते यांनी टीटीसी बावधन मधील कामांबाबतची माहिती दिली. जून २०२६ पर्यंत ८० पेक्षा अधिक बिबट्याकरिता उपचार उपलब्ध करुन देणार असल्याचे सांगितले.

श्री. ठाकरे यांनी पिंपरखेड मधील शोध अभियान चालू ठेवण्याबाबत सूचना दिल्या आणि यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याबाबत सूचना केली. तसेच बिबट्यांच्या संख्या नियंत्रणासाठी इम्युनो-कॉन्ट्रासेप्टीव्ह पध्दतीची केंद्र शासनाची परवानगी प्राप्त झाली असल्याचे त्यांनी यावेळी म्हणाले.

## बिहारमध्ये नव्या सरकारच्या हालचालींना वेग; २२ नोव्हेंबरपूर्वी शपथविधीची शक्यता

पटना : बिहारमध्ये नवं सरकार येत्या २२ नोव्हेंबरपूर्वी स्थापन होईल, अशी माहिती केंद्रीय मंत्री आणि एलजेपीचे (रामविलास) प्रमुख चिराग पासवान यांनी दिली. त्यांनी सांगितलं की, विधानसभा निवडणुकीत एनडीए आघाडीला मिळालेल्या विजयामुळे सरकार स्थापनेची हालचाल वेगाने सुरू झाली आहे.

बिहार विधानसभेचा कार्यकाळ २२ नोव्हेंबरला संपत असल्याने, त्यापूर्वीच प्रशासकीय आणि राजकीय पातळीवर प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी चर्चा सुरू आहे. घटक पक्षांमध्येही मंत्रिमंडळ वाटप आणि पुढील धोरणांवर विचारमंथन सुरू असल्याचं समजतं.

विधानसभेच्या निवडणुकीत एनडीएने अभूतपूर्व यश मिळवत २४३ पैकी २०२ जागांवर विजय मिळवला. भाजप ८९ जागांसह सर्वात मोठा पक्ष झाला तर जेडीयूने ८५ जागा जिंकल्या. लोक जनशक्ती पक्षाने १९, हिंदुस्थानी अवाम मोर्चाने पाच आणि राष्ट्रीय लोक मोर्चाने चार जागांवर विजय मिळवला.

महागठबंधनमधील आरजेडीने २५, काँग्रेसने सहा, सीपीआयएमएलएलने दोन, सीपीआयएम आणि आयआयपीने प्रत्येकी एक जागा जिंकली.

बीएसपीने एक तर एमआयएमने ५ जागांवर विजय मिळवला. नव्या कॅबिनेटमध्ये भाजपचं प्रतिनिधित्व वाढण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्रीपदासाठी नितीशकुमार यांचं नाव निश्चित मानलं जात आहे. नव्या मंत्रिमंडळात जेडीयूचे १४ आणि भाजपचे १६ मंत्री असतील तसेच भाजपकडे अनेक महत्त्वाची खाती असतील, असे समजते.

## दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये हिंदू धर्म आणि महिला या विषयावरील सुनीता पेंढारकर यांच्या शोधनिबंधाचे सादरीकरण

पुणे (प्रतिनिधी) : नवी दिल्ली येथील श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठाने ७ आणि ८ नोव्हेंबर रोजी विद्यापीठाच्या कॅम्पसमध्ये हिंदुत्व के विमर्श : चुनौतियाँ,समाधान और भविष्य या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले होते.या परिषदेत भारत आणि इतर देशातील अनेक विद्वान,संशोधक आणि शिक्षणतज्ज्ञांनी भाग घेतला आणि हिंदुत्वाच्या तात्विक,सांस्कृतिक आणि सामाजिक परिमाणांवर तसेच त्याच्या समकालीन दृष्टिकोनावर विचारांची देवाणघेवाण केली.

या आंतरराष्ट्रीय परिषदेत पुणे, महाराष्ट्र येथील सुनीता पेंढारकर यांनी हिंदू धर्म आणि महिला या विषयावर त्यांचा शोधनिबंध सादर केला. त्यांचा उद्देश असा होता की इसवी सन पूर्व काळापासून आपल्या हिंदू धर्मात महिलांना आदरणीय स्थान दिले गेले आहे. महिलांना अपमानित करण्याचा किंवा दडपण्याचा कधीही प्रयत्न झाला नाही.या शोधनिबंधात सुनीता यांनी हिंदू धर्म आणि इतर धर्मांमधील महिलांबाबतचा फरक सविस्तरपणे स्पष्ट केला आहे. पुरुष आणि महिलांच्या उत्पत्तीपासून,महिला शतकानुशतके विविध प्रकारची कामे करत आहेत. अत्यंत कठीण परिस्थितीत,प्रत्येक क्षेत्रात निर्भयपणे स्त्री शक्तीने संचार केला आहे. आपल्या नवीन पिढीला सुमारे २००० वर्षांचा इतिहास शिकवला पाहिजे,तरच प्रत्येक घरात




दुर्गा आणि सरस्वती जन्माला येतील आणि भारत विश्व गुरु होईल.

या प्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह अरुण कुमार हे प्रमुख पाहुणे आणि प्रमुख वक्ते होते.समारोप सत्रात,प्रमुख पाहुणे आणि वक्ते,राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सहसरकार्यवाह डॉ.कृष्ण गोपाल यांनी सांगितले की, हिंदू समाजाने हिंदुत्व समजून घेणे आवश्यक आहे. हिंदुत्व ही एक आध्यात्मिक भावना आहे जी मनाच्या आत राहते. अध्यात्म म्हणजे भेदभावांचा अंत. भेदभावांच्या दृष्टीचा अंत झाल्यामुळे अभेदभावाच्या दृष्टीचा उदय होतो.

या परिषदेत दोन दिवस १६ समांतर सत्रे झाली,ज्यामध्ये १२० हून अधिक विद्वान आणि संशोधकांनी त्यांचे शोधनिबंध सादर केले.ब्रिटनमधील लुसी गेस्ट,बेल्जियममधील मार्टिन गुरविच आणि अमेरिकेतील क्रिस्टोफर शॅनन यांच्यासह विविध भारतीय राज्ये आणि विद्यापीठांमधील असंख्य संशोधकांनीही हिंदुत्व आणि त्याच्या प्रासंगिकतेबद्दल त्यांचे विचार मांडले.

सुनीता पेंढारकर यांच्या शोधनिबंधाची प्रशंसा करताना सत्राचे अध्यक्ष जनार्दन चौहान म्हणाले की,असे शोधनिबंध लिहिले पाहिजेत आणि सुनीता यांनी महिला सक्षमीकरणाची जी तेजस्वी प्रतिमा सर्वांसमोर मांडली आहे ती लक्षात ठेवली पाहिजे तिचा आदर्श सर्वांनी आपल्या मध्ये अंगिकारला पाहिजे.

हा कार्यक्रम श्री लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय संस्कृत विद्यापीठ, भारतीय तत्वज्ञान संशोधन परिषद (खउझठ),विश्व संवाद केंद्र आणि दिल्ली विद्यापीठातील हिंदू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'ऊत' मराठी चित्रपट २१ नोव्हेंबरला प्रदर्शित

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ नोव्हेंबर :** 'ऊत' भावनांचा उद्रेक हा मराठी चित्रपट येत्या २१ नोव्हेंबरला प्रदर्शित होत आहे. चित्रपटात लातूर जिल्ह्यातील मुरुड नायगावचे सुपुत्र पुरूषोत्तम वाघ यांची महत्त्वाची भूमिका आहे. लातूरच्या या कलावंताचा दमदार अभिनय पाहण्यासाठी प्रेक्षकांनी चित्रपटगृहात नक्की यावे, असे आवाहन निर्मात्यांनी केले आहे.

वाघ यांचा अभिनय क्षेत्रातील अनुभव मोठा आहे; त्यांनी यापूर्वी अनेक मराठी व हिंदी मालिका, लघुपट, जाहिराती तसेच एका मल्याळम् चित्रपटातही काम केले आहे. नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम.ए. (नाट्यशास्त्र) पूर्ण केलेले आहे.

प्रदर्शनापूर्वीच चित्रपटाला आंतरराष्ट्रीय १८ पुरस्कार प्राप्त आहेत. लातूरचे सुपुत्र आणि गुणी कलाकार वाघ यांनी या चित्रपटात 'नंदू' ची भूमिका साकारली आहे. त्यांची ही भूमिका संघर्ष, रोमान्स आणि एका उत्कृष्ट नेत्यामध्ये असणारे गुण दाखवणारी आहे.






# प्रत्येक ठिकाणी तोलामोलाचे सक्षम उमेदवार देणार : आ. कराड

## लातूर पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकविण्याचा बोरीच्या मेळाव्यात संकल्प

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ नोव्हेंबर :** केंद्रात आणि राज्यात भाजपाच्या नेतृत्वातील शासन सर्वांगीण विकासासाठी, सर्वसामान्यांच्या हितासाठी काम करत असून ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही. रेणापूर नगरपंचायतीसह पंचायत समितीवर पुन्हा भाजपाचा झेंडा फडकणार हे सूर्यप्रकाशा इतके सत्य असून यावेळी कुठल्याही परिस्थितीत लातूर पंचायत समितीवर भाजपाचा झेंडा फडकला पाहिजे यासाठी सर्वांनी संकल्प करावा. लातूर ग्रामीणमधील काडगाव जिप मतदार संघातून नाथसिंह देशमुख यांची उमेदवारी जाहीर करत सर्वच जागेवर तोलामोलाचे सक्षम उमेदवार देऊन तेरापैकी अकरा जागेवर भाजपा विजयी होणार असल्याचे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण मंडळाच्या वतीने येत्या काळात होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने भातांगळी जिल्हा परिषद मतदार संघाचा लातूर तालुक्यातील मौजे बोरी येथे भाजपाच्या विजयाचा संकल्प मेळावा





आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी झाला.

मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी वाजिद पटेल हे होते तर या मेळाव्यास भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, भाजपा ज्येष्ठ नेते नाथसिंह देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले यांच्यासह मंडल अध्यक्ष प्रताप पाटील, महादेव साळुंके, विजयकुमार मलवाडे, सतीश आंबेकर, साहेबराव मुळे, विजय काळे, पांडुरंग बालवाड, बापूराव चामले, सूर्यकांत शेळके, महेंद्र गोडभरले, सुरज शिंदे, शरद दरेकर, आदिनाथ मुळे यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यास भातांगळी जिल्हा परिषद मतदार संघातील गावागावातील भाजपा पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी काँग्रेसच्या अनेकांनी भाजपा जाहीर प्रवेश केला.

यावेळी बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, स्वातंत्र्यानंतर सर्वाधिक काळ देशात आणि राज्यात काँग्रेसनेच सत्ता हस्तगत करून कारभार केला. गेल्या अकरा वर्षात परिवर्तन झाले.

केंद्रात नरेंद्रजी मोदी आणि राज्यात देवेंद्र यांच्या नेतृत्वातील शासनाने अनेक कल्याणकारी योजना राबवून गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना देण्याचे काम झाले. मात्र काँग्रेसवाल्यांनी आजपर्यंत गरिबांना गरीबच ठेवण्याचे पाप केले. त्यामुळेच संपूर्ण देशभर काँग्रेसची वाताहत होत असल्याचे सांगून लातूर ग्रामीण मध्ये पंधरा वर्ष काँग्रेस आमदाराने काय विकास केला कोणत्या गावाला कुठली योजना दिली असा प्रश्न उपस्थित करून गेल्या चार वर्षात मतदार संघातील प्रत्येक गावागावात वाडी वस्तीत विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला असल्याचे बोलून दाखविले.

बोरी येथील मेळाव्यास भाजपाचे सुरेखा पुरी, पद्माकर चिंचोलकर, संजय ठाकूर, अशोक बिराजदार, हनुमंत गव्हाणे, मारुती शिंदे, चंद्रकांत पासमे, राम बंडापल्ले, सतिश बिराजदार, भैरवनाथ पिसाळ, लक्ष्मण नागिमे, दीपक वांगस्कर, रुपेश थोरमोठे, लिंबराज बोळंगे, पुंडलिक बेंबडे, रुपेश काळे, लक्ष्मण मुळे, धनंजय बंडापल्ले, विजय ठाकूर, संजय सावंत, आत्माराम जाधव, सुरेश पाटील, मुकुंद केसरे, बालाजी पांचाळ, आत्माराम शिंदे, यादवराव पाटील, महेश सुरवसे, धीरज सपाटे, गणेश बेंबडे, विकास पेदाटे, राजेंद्र खुर्दळे यांच्यासह बोरी, सलगरा, दगडवाडी, मुशिराबाद, उमरगा, रमजानपुर, भातांगळी, चिकलठाणा, बामणी, भाडगाव, भातखेडा, भडी, ममदापूर यासह भातांगळी जिल्हा परिषद मतदार संघातील गावा गावातील वाडी वस्तीतील भाजपाचे कार्यकर्ते पदाधिकारी लोकप्रतिनिधी मतदार बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 'स्टडी ब्रॉड फेअर' आता लातूरमध्ये

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ नोव्हेंबर :** विलासराव देशमुख फाउंडेशन, लातूर आणि अलिफ मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाड्यातील पहिला आणि सर्वात मोठा 'स्टडी ब्रॉड फेअर' दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी व्ही.डी.एफ. कॅम्पस नवीन एमआयडीसी, एअरपोर्ट रोड, लातूर येथे आयोजित करण्यात येत आहे. लातूरच्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करणारा हा एक ऐतिहासिक क्षण आहे.

या स्टडी ब्रॉड फेअरमध्ये अमेरिका, इंग्लंड, स्पेन, स्वित्झर्लंड, जर्मनी, न्यूझीलंड, सिंगापूर, दुबई, नेदरलँड, मलेशिया अशा अनेक देशांमधील १५ हून अधिक नामांकित विद्यापीठे सहभागी होणार आहेत. लातूरमध्ये बसून जगभरातील विद्यापीठांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे.

**सहभागी प्रमुख विद्यापीठे**

यूएमएएसएस बोस्टन (अमेरिका), यूसीएएम (स्पेन), एशिया स्पेसिफिक युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजी अँण्ड इनोव्हेशन-एपीयु (मलेशिया), डी मॉन्टफोर्ट युनिव्हर्सिटी (इंग्लंड), टीआयओ बिझनेस स्कूल (नेदरलँड), एचटीएमआय (स्वित्झर्लंड), जर्मन इंटरनॅशनल कॉलेज (जर्मनी), युनिव्हर्सिटी ऑफ कॅंटरबरी (न्यूझीलंड), एमडीएक्स दुबई (दुबई).

या मेळाव्यात संबंधित विद्यापीठांच्या तज्ज्ञांकडून विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी महत्त्वाचे ठरणारे सखोल मार्गदर्शन मिळणार आहे. अभ्यासक्रम आणि संधी: विविध देशांतील विद्यापीठांतर्गत चालणारे अभ्यासक्रम, त्यांचे महत्त्व, पात्रता, प्रवेश प्रक्रिया आणि अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर नोकरीच्या संधी याबद्दल माहिती मिळेल. व्यवहारिक माहिती: निवास, भोजन, हॉस्टेल, पार्ट-टाइम जॉब्स आणि स्थानिक सुविधा याबद्दल पारदर्शक आणि अचूक माहिती दिली जाणार आहे.

हा फेअर म्हणजे संपूर्ण जग एका छताखाली आणणारा सुवर्णमेळावा आहे. तेव्हा लातूर जिल्ह्यातील १२ वी, ग्रॅज्युएशन किंवा पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्समध्ये शिक्षण घेत असलेल्या अंतिम वर्षातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या स्टडी ब्रॉड फेअरला १९ नोव्हेंबर रोजी भेट देऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन विलासराव देशमुख फाउंडेशन ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे प्राचार्य डॉ. बालाजी वाकुरे, प्रा. राजकुमार साखरे आणि प्रा. महेश शिंदे यांनी केले आहे.

## वंचित व गरजुंना माणुसकीची चादर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ नोव्हेंबर :** रविवार, दि.१६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रभुराज प्रतिष्ठान, लातूर वतीने मायेची ऊब सतत ११ वर्षे अविरत सेवा हिवाळ्यात गरजू व वंचित लोकांना उभदार चादर वाटप करण्याचे उपक्रम हाती घेतला जेणे सध्या कडाक्याची थंडी वाढत असल्याने प्रत्येकजण थंडीपासून बचाव करण्यासाठी उबदार कपडे परिधान करतात त्याच परिस्थिती लातूर शहरात बेघर आणि निराधार लोक कश्याचा तरी आसरा घेत निपुटपणे थंडीत कुडकुडत झोपत असत. पण त्यांचे ही थंडीपासून बचाव व थंडीचा सामना करण्यासाठी प्रभुराज प्रतिष्ठानने पुढाकार घेत झोपित असलेल्या वंचित लोकांना उबदार मायेची चादर पांगरण्यात आली.

तसेच त्यांच्या अंगावर मायेची उबदार चादर पांगरण्यासाठी वंचित, गरजू लोकांचा रात्रभर शोध घेत कोणी दुकानाच्या तर कोणी बसस्थानकचा आडोसा पकडत आपली रात्र घालत असताना दिसून येताच सामाजिक केली.




बांधलकी जपून यांना मदत करण्याचा प्रयत्न केला. जसे जमेल तसे सहकाऱ्याच्या साहाय्याने उबदार चादरी वाटप करून कर्तव्य निभावण्याचा प्रयत्न केला. कोणी वेढ्याच्या परिस्थिती आढळून आले असता त्यांचे गैरवर्तणुक व छिडछिडेपणा ही सहन करत त्यांना आपल्यात सांभाळून घेत तेही मानव आहेत अशी भावना ठेवत त्यांनाही मदत

यावेळी प्रभुराज प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. अजय कलशेट्टी, सचिन गोलावर, डॉ. संजय जमदाडे, विलास भुमकर, विनोद गायकवाड, हुसेन पठाण, अभिजित सिरसाठ, शशीकिरण नागुरे, नंदकिशोर बनाळे, महेश खेकडे, विजय वारद, अशोक पंचाक्षरी, शाम सावंत, गोपाळ कतलाकुट्टे, नेवासस्कर, सचिन वांगस्कर, रवी घुगरे, राम डुमने आदींनी परिश्रम घेतले.

## नाईक चौकात सिग्नलची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १७ नोव्हेंबर :** लातूर शहरातील रिंग रोडवरील वसंतराव नाईक चौकातील वाहतुकीची वाढती वर्दळ लक्षात घेता याठिकाणी तात्काळ सिग्नल सुविधा सुरु करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे. नाईक चौकात मागच्या काही दिवसात रात्रीच्या वेळेला मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होताना दिसत आहे. या ठिकाणी सिग्नल सुरु केल्यास वाहतुकीलाही शिस्त लागेल आणि वाहतुकीची कोंडीही होणार नाही. त्यामुळे प्रशासनाने लातूर शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासोबतच अपघात टाळण्यासाठी त्वरित नाईक चौकात सिग्नल सुरु करण्यात यावेत,अशी मागणी होत आहे.

## लातुरात बाळासाहेब ठाकरेंना अभिवादन




**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ नोव्हेंबर :** हिंदुऱ्हदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त सोमवारी सकाळी ठाकरे शिवसेना लातूर शहर विधानसभा संघटक रमेश संभाजी माळी यांच्या जनसंपर्क कार्यालयात बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन ज्येष्ठ शिवसैनिक भास्कर माणिकराव माने व मच्छिंद्र कांबळे यांच्या हस्ते करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ शिवसैनिक, शिव आरोग्य सेनेचे लातूर जिल्हा समन्वयक त्र्यंबक गुरुनाथ स्वामी, फेरीवाला संघटना लातूर जिल्हा अध्यक्ष हणमंत पडवळ, लातूर शहर विधानसभा प्रमुख एस. आर. चव्हाण, लातूर शहर संघटक दिलीप भांडेकर, शिवराज मुळावर, शालेय विद्यार्थी वाहतूक रिक्षा सेनेचे लातूर शहराध्यक्ष सुमीर सुर्यवंशी, बालाजी कुंभारकर, सुरज भांडेकर, गणेश शिंदे, कृष्णा जाधव, बाबा शेख, परमेश्वर गुट्टे, राकेश रणखांब, ज्ञानेश्वर सूर्यवंशी, विकास माने, ज्ञानेश्वर गवळी, संभाजी माळी आदी उपस्थित होते.

## राज्य परिवहन महामंडळात होतेय प्रामाणिक कर्मचाऱ्यांची हेळसांड

**त.भा. वृत्तसेवा/प्रमोद सुरवसे**

**लातूर, १७ नोव्हेंबर :** राज्य परिवहन महामंडळात आजमितीस २८ कर्मचारी संघटना असून प्रत्येक डेपोमध्ये किमान ८ ते १० कर्मचारी संघटना कार्यरत आहेत. संघटनेच्या नावाखाली ही मंडळी मनमानी कारभार करतात. त्यामुळे प्रामाणिक कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात हेळसांड होत असल्याचे पाहावयास मिळत आहे.



एका कर्मचारी संघटनेकडे अध्यक्ष-सचिवांसह किमान वीस कर्मचारी समाविष्ट असतात. संघटनेच्या नावाखाली त्यांच्याशी जोडल्या गेलेल्या कर्मचाऱ्यांना हव्या तशा ड्युट्या मिळतात. तर अन्य कर्मचाऱ्यांना ड्युट्यासाठी वरिष्ठांकडून अनेकदा आर्थिक उलाढालही होत असल्याची माहिती महामंडळातील एका वाहकाने आपले नाव उघड न करण्याच्या अटीवर संगितले. यात हेळसांड होतेय ती प्रामाणिक काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची. कारण या कर्मचाऱ्यांना कोणी वालीच नसतो,अशी परिस्थिती अनेक ठिकाणी निर्माण झाल्याचे दिसून येते. या बाबतीत एका कंडक्टरनी नाव न छापण्याच्या अटीवर बरीच माहिती सांगितली. जाणून बुजून प्रामाणिक काम करणारे कंडक्टर असो की ड्रायव्हर यांना लांब पल्ल्याच्या गाडीवर पाठवले जाते. जेणे करून इकडे काय चालले आहे याची संबंधितांना माहिती कळू नये, यासाठीची हे धडपड असल्याचे सांगण्यात येते.

ग्रामीण भागात मुक्कामी जाणाऱ्या एसटी बससाठी संघटनेशी संबंधित कर्मचाऱ्यांना रात्रीचा भत्ता मिळू नये याकरिता बऱ्याचदा रात्री मुक्कामी गाड्या रिकाम्या परत बोलावल्या जातात. अशा कर्मचाऱ्यांना त्याच गावाची ड्युटी सकाळी दिली जाते. म्हणजे त्यांना रात्री रिकामी गाडी घेऊन आलेल्या गावातच सकाळच्या सत्रात प्रवासी वाहतूक करावी लागते.

यामध्ये शंभर रुपयांचा भत्ता कर्मचाऱ्यांना मिळू नये म्हणून परिवहन महामंडळाचे हजारोंचे डिझेल वाया घालवण्याचे काम तथाकथित कर्मचारी संघटनेची मंडळी करतात. याबाबतीत काही विचारणा केली तर युनियन कडे पाठविले जाते. युनियनवाले मग त्यांच्या फायद्यासाठी चाली खेळतात. एक युनियन असेल तर ठिक पण येथे किमान दहा युनियन म्हणजे दहा मते . मग त्यांच्यात एकमत कसे होईल? कर्मचाऱ्यांच्या पगारवाढीचा किंवा इतर भत्ता वाढीचा विषय निघतो, तेव्हा एसटी महामंडळ तोट्यात चालत असून कुठलीही वाढ मिळणार नाही, असे सांगितले जाते. या कामात युनियनवाले मोलाची भूमिका बजावतात .महामंडळ खरेच तोट्यात आहे की नाही? याची एका समितीच्या मार्फत चौकशी आयोग नेमून चौकशी करावी, अशी मागणीही संघटना-युनियनच्या त्रासाने वैतागलेल्या कर्मचाऱ्यांतून केली जात आहे.

## आठवी अ.भा. बौद्ध धम्म परिषद २५ डिसेंबरला

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १७ नोव्हेंबर :** बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त लातूरकरांच्या वतीने गुरुवार, दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी महाविहार, धम्म केंद्र सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव ता. लातूर येथे आठवी अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली असून या परिषदेस देश - विदेशातील बौद्ध भिक्खू उपस्थित राहून मार्गदर्शन करणार असल्याची माहिती संयोजक भिक्खू पय्यानंद थेरो यांनी सोमवारी लातुरात पत्रकार परिषदेत दिली.

बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट व समस्त लातूरकरांच्या सहकार्याने यशस्वी स्वरूपात २०१७ साला पासून सातत्याने सात धम्म परिषदा भव्य स्वरूपात संपन्न झाल्या असुन प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी भिक्खु डॉ. उपगुप्त महाथेरो यांच्या मार्गदर्शनाखाली आठवी अ. भा. बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. अ.भा. भिक्खू संघ शाखा महाराष्ट्र प्रदेशचे अध्यक्ष भिक्खू धम्मसेवक महाथेरो (मुळावा) हे परिषदेच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत.



या परिषदेचे उद्घघाटन भिक्खू करूणानंद महाथेरो दिल्ली (संघनायक, अखिल भारतीय भिक्खू संघ, बुद्धगया) यांच्या हस्ते होणार आहे. या प्रसंगी सातकर्णी स्मरणिकेचे प्रकाशन भिक्खू प्रा.डॉ. खेमधम्मो महाथेरो (मुळावा) यांच्या हस्ते होणार आहे. आठव्या धम्म परिषदेच्या सकाळच्या पहिल्या सत्रात सकाळी ठीक आठ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक लातूर येथे पंचरंगी धम्मध्वजारोहण, त्यानंतर धार्मिक देखावे व बुद्धमूर्ती सहीत भिक्खू संघ व उपासक-उपासिका यांच्या उपस्थितीत धम्म मिरवणुकीस प्रारंभ होईल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क पासून निघालेली ही मिरवणूक गांधी चौक, बसस्टॅन्ड, हनुमान चौक, गंजगोलाई मार्गे अण्णाभाऊ साठे चौकात जाऊन तेथून परत आंबेडकर पार्क येथे धम्म मिरवणुकीचा समारोप होईल. त्यानंतर मुख्य धम्म ध्वजारोहण भिक्खू शरणानंद महाथेरो (पाथरी) यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे सकाळी ठीक १०:०० वाजता संपन्न होईल. दरवर्षी प्रमाणे यावर्षी दिनांक २५ डिसेंबर २०२५ रोजी आठव्या अ.भा. बौद्ध धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आलेले आहे. यावेळी अभ्यासू विद्वान पू. भिक्खू संघ व मान्यवर मंडळी उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत. तेव्हा धम्म परिषदेस आपण सर्वांनी तन-मन-धनाने सहकार्य करावे व पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करून हजारोंच्या संख्येने उपस्थित राहुन धम्म परिषदेचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. यावेळी देशविदेशातील भिक्खुगण उपस्थित राहुन धम्मदेसना देणार आहेत, असेही भिक्खू पय्यानंद थेरो यांनी यावेळी सांगितले.

## लातुरात दिवसा कडक उन्ह, रात्री कडाक्याची थंडी

*त.भा. वृत्तसेवा,*

***लातूर, १७ नोव्हेंबर :*** *मागच्या चार दिवसांपासून लातूर शहर व परिसरात दिवसा कडक म्हणजे चांगलेच चटके बसणाऱ्या उन्हाच्या झळा बसत असून रात्रीच्या वेळेस कडाक्याची, झोंबणारी थंडी जाणवत असल्याचे अनुभवास येत आहे.*

*यावर्षीच्या पावसाळ्यात मागच्या अनेक वर्षाच्या तुलनेत जास्तीचा पाऊस झाला आहे. अनेक ठिकाणी अतिवृष्टीही झाली. लातूर जिल्ह्यातील जवळपास सर्वच गावांना अतिवृष्टीचा फटका बसला. पावसाळ्यात झालेल्या जास्तीच्या पावसाने थंडीचे प्रमाणही अधिक राहणार असल्याचा अंदाज तेव्हाच व्यक्त केला जात होता. मागच्या काही दिवसात थंडीचे प्रमाण कमी जास्त होताना पाहायला मिळाले. त्यातच आता मागच्या चार दिवसांपासून थंडीच्या प्रमाणात कमालीची वाढ झाली आहे. दिवसाच्या वेळेत अक्षरशः उन्हाळ्यासारखे उन्हाचे चटके बसत आहेत. तर सायंकाळपासून बोचऱ्या थंडीचे वातावरण राहत आहे. त्यामुळे शहर व परिसरात सायंकाळी साधारणतः साडेसहा सातपासूनच थंडी जाणवत आहे. जसजशी रात्र वाढत जाईल तसतसा थंडीचा कडाकाही वाढताना दिसून येतोय. रात्री दहानंतर तापमानात कमालीचा गारठा निर्माण होताना पाहायला मिळत आहे. परिणामतः गरम कपडे, स्वेटर्सच्या दुकानासमोर ग्राहकांची चांगलीच गर्दी पाहायला मिळत आहे. आता नोव्हेंबर महिना चालू असून ही थंडी किमान फेब्रुवारीच्या अखेरपर्यंत कायम राहण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.*

## एम.आय.एम पक्षाकडून नगराध्यक्ष सह नगरसेवक पदासाठी ४ उमेदवार



तभा वृत्तसेवा

पैठण :- पैठण नगर परिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी किंग मेकर ठरणाऱ्या असोद्दीन ओवेसी यांच्या एम. आय. एम पक्षाकडून नगराध्यक्ष पदासह प्रभाग ८, १०, आणि प्रभाग ११ नगरसेवक पदासाठी उमेदवार दिल्याने या निवडणुकीत कमालाची चुरस पाहण्यास मिळणार आहे. पक्षाचे तालुकाध्यक्ष मंसूर शेख, शहराध्यक्ष निसार बागवान, नगराध्यक्ष पदाचे उमेदवार नाहिद बबलू बागवान यांच्या उपस्थित भाजी मार्केट आणि नेहरू चौक भागात अतिशबाजी करून जल्लोष कारण्यात आला. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५

**एमआयएम पक्षाची उमेदवारी**

निसार जमीर बागवान

प्रभाग क्रमांक ११ (ब-सर्वसाधारण पुरुष).फरजाना अब्दुल रऊफ नांदेडकर,प्रभाक क्रमांक ८ (ब-सर्वसाधारण महिला).शकीलाबी सलीम शेख,प्रभाग क्रमांक १० ( ओबीसी महीला).मंगलसिंग भवरे

प्रभाक क्रमांक ८ (अ-अनुसूचित जाती).नगराध्यक्षा पदासाठी

नाहिद शफीक (बबलूभाई) बागवान

(सर्व साधारण महिला) यांना देण्यात आली आहे. यावेळी पक्षाचे सर्व उमेदवार निवडून आणण्याचा निर्धार कारण्यात आला. या प्रसंगी पैठण तालुका अध्यक्ष मंजूर शेख, युवा तालुका अध्यक्ष सोहेल सय्यद, शेख परवेज, रफिक नांदेडकर, हमीद बागवान, तोहीद बागवान सह मोठया संख्येने नागरिक उपस्थित होते.

## देशभरातील रोडशोजसह कोटक बिझलॅब्स सीझन २ सुरू

मुंबई: आयआयएमए व्हेंचर्सने कोटक महिंद्रा च्या सहकार्याने कोटक बिझलॅब्स सीझन २ आणि देशव्यापी रोडशोजची मालिका सुरू केली आहे. या कार्यक्रमाचा उद्देश भारतातील टियर-२ आणि टियर-३ शहरांतील सामाजिक प्रभाव आणि शाश्वततेवर काम करणाऱ्या ७५ स्टार्टअप्सना वाढीची गती देणे आहे. या अंतर्गत संस्थापकांना मार्गदर्शन, निधी सहाय्य आणि नेटवर्किंग संधी मिळणार आहेत, ज्यामुळे ते स्केलेबल आणि टिकाऊ उपक्रम उभारू शकतील.पुढील रोडशोज १९ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी मुंबई येथे सायंकाळी ५ वाजल्यापासून आयोजित केले जातील. या सत्रांमध्ये उद्योजकांना आयआयएमए व्हेंचर्स आणि कोटक महिंद्रा बँकचे मेंटर्स आणि प्रोग्रॅम लीडर्स यांच्याशी थेट संवाद साधता येईल.

## झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट २०२६ - ५ डिसेंबर पर्यंत अर्ज करा

मुंबई - झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट २०२६ या भारतातील एका सर्वाधिक विश्वासार्ह मॅनेजमेंट प्रवेश प्रक्रियेच्या नोंदणीची अंतिम मुदत नजीक येत आहे. या नोंदणीसाठी ५ डिसेंबर २०२५ ही अंतिम तारीख आहे. भारतभरातील २५० हून अधिक मान्यताप्राप्त संस्थांमध्ये एमबीए/पीजीडीएम अभ्यासक्रमात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना अंतिम तारखेपूर्वी त्यांची अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. झेविअर ॲप्टिट्यूड टेस्ट २०२६ साठीची नोंदणी १० जुलै २०२५ रोजी सुरू झाल्यानंतर आजवर हजारो विद्यार्थी प्रवेशाच्या या शर्यतीत सहभागी झाले आहेत. आता अंतिम तारीख जवळ येत असल्याने ऑनलाइन अर्ज पूर्ण करणे, आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे, परीक्षेसाठीच्या शहराचा प्राधान्यक्रम देणे आणि फी भरणे अशा सर्व आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे आवश्यक झाले आहे.

## मनोरंजक किड्स कार्निव्हलचे आयोजन

ठाणे : होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया यांनी ठाणे येथील ट्रॅफिक ट्रेनिंग पार्कमध्ये प्रेसीडेंसी इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांसाठी रस्ता सुरक्षा शिक्षण तसेच मजेदार किड्स कार्निव्हलच्या विविध उपक्रमांचे आयोजन केले. हा उपक्रम मुलांमध्ये रस्ता सुरक्षा ही एक दैनंदिन जबाबदारी आहे, एकदाच शिकण्याची गोष्ट नाही, अशी भावना निर्माण करण्यासाठी रचण्यात आला आहे. सत्रांमध्ये विद्यार्थ्यांना पादचारी मार्गाचा वापर करणे, विचलनांपासून दूर राहणे, हेल्मेट घालणे यांसारखी साधी पण महत्त्वाची कृती रस्ते सुरक्षेत किती मोठा फरक घडवू शकते, याचा विचार करण्यास प्रोत्साहन देण्यात आले.

## आंतरराष्ट्रीय शाळांतील विद्यार्थ्यांना प्रेरणा

पुणे - पोदार आंतरराष्ट्रीय शाळांतील विद्यार्थ्यांनी जगप्रसिद्ध फ्रीस्टाइल फुटबॉलर जेमी नाइट यांचे पुन्हा स्वागत करताना उत्साह आणि आनंद व्यक्त केला. जेमी नाइट हे जगातील शीर्ष दहा फ्रीस्टाइल फुटबॉलपटूंमध्ये गणले जातात आणि अनेक वेळा गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे मानकरी ठरले आहेत.भारताच्या सहाव्या दौऱ्यावर, जेमी पुण्यातील ५ पोदार आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये विशेष फ्रीस्टाइल फुटबॉल कार्यशाळा घेत आहेत. या कार्यशाळा पोदार एज्युकेशन नेटवर्कच्या क्रीडा उत्कृष्टता उपक्रमाचा महत्वपूर्ण भाग आहेत. या सत्रांचे उद्दिष्ट विद्यार्थ्यांना सर्जनशीलता, एकाग्रता आणि क्रीडाप्रेम यांच्या माध्यमातून प्रेरित करणे आहे.

## लोकमंगल सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याचे २० वर्षे पूर्ण

महाराष्ट्र: लोकमंगल फाउंडेशनतर्फे सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याला यंदा २० वर्षे पूर्ण झाली. २००६ मध्ये सुरू झालेल्या या उपक्रमाने आजवर सलग ४६ भव्य विवाह सोहळे आयोजित केले असून, एकूण ३२०५ जोडप्यांचे विवाह सामूहिक पद्धतीने संपन्न केले आहेत. समाजातील दुर्बल व सर्वधर्मीय कुटुंबांना आधार देणारा हा उपक्रम महाराष्ट्रातील सर्वात मोठा आणि सातत्याने राबला जाणारा सामुदायिक विवाह सोहळा ठरला आहे. या सर्व सामाजिक कामगिरीचे मूळ व्यक्तिमत्त्व म्हणजे माजी सहकार मंत्री व आमदार सुभाष देशमुख. गेल्या दोन दशकांपासून त्यांनी सामुदायिक विवाह सोहळ्याद्वारे समाजातील अनाठायी विवाह खर्चाला आळा घालणे, सर्वधर्म समभाव वाढवणे आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत कुटुंबांना उभारी देणे हे उद्दिष्ट साध्य केले आहे.

# खाजगी हॉटेलच्या ठिकाणी एसटी बसेस थांबविण्याचे धोरण रद्द करा

### मुख्यमंत्र्यांकडे मागणी; राज्यव्यापी आंदोलनाकरिता एसटी प्रवासी संघटनांनी पुढे यावे

अहिल्यानगर : राष्ट्रीय तसेच राज्य महामार्गांवर खाजगी हॉटेलच्या ठिकाणी राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसना थांबा देण्याचे धोरण महामंडळाने तयार केलेले आहे. याबाबतचे सुधारित परिपत्रक दि १३ जून २०२५ रोजी जारी करण्यात आले आहे. परंतु याबाबत प्रवाशांच्या सातत्याने तक्रारी येऊनही त्यांची दखल घेतली जात नाही. त्यामुळे सदरचे धोरण तात्काळ रद्द करण्यात यावे अशी मागणी अभय ललवाणी यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ई-मेल निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, १) सदर धोरण हे प्रवाशांना चांगली सेवा देण्यासाठी व परिवहन महामंडळाचे उत्पन्न वाढविण्यासाठी निश्चित करण्यात आलेले असल्याचे संदर्भीय परिपत्रकात म्हटलेले आहे. तथापि, या धोरणाविषयी एसटी प्रेमी प्रवाशांमध्ये अतिशय तीव्र नाराजी आहे. या हॉटेल थांब्यांवर असलेली अस्वच्छता, निकृष्ट दर्जाचे व तुलनात्मक दृष्ट्या महागडे खाद्यपदार्थ, याबाबतच्या सातत्याने तक्रारी होऊन देखील महामंडळ याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे असे निदर्शनास येते.

२) या धोरणानुसार निश्चित करण्यात आलेल्या हॉटेल थांब्यांवर बसेस थांबण्याचा कमाल कालावधी हा १५ मिनिटे आहे. मात्र सर्व बसेस ३० ते ४५ मिनिटे तर काही बसेस ५० ते ५५ मिनिटे हॉटेल थांब्यांवर थांबत असल्याचे प्रकार निदर्शनास येत आहेत. एकीकडे महाराष्ट्र शासन प्रवाशांचा प्रवासासाठी लागणारा वेळ वाचावा या दृष्टीने द्रुतगती महामार्ग, समृद्धी महामार्ग यासारखे कोट्यावधी रुपयांचे खर्चाचे प्रकल्प राबवित आहे. मात्र विषयांकीत धोरणामुळे एसटी बसद्वारे प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा ३० ते ५५ मिनिटांचा वेळ विनाकारण वाया जात आहे. विषयांकीत धोरण हे शासनाच्या जलदगती महामार्ग निर्मिती धोरणाशी पूर्णपणे विसंगत असल्याने विषयांकीत धोरण हे तात्काळ रद्द करण्यात यावे.

३) खाजगी हॉटेल मॉटेलच्या ठिकाणी देण्यात येणारा बस थांबा हा मूलतः प्रवाशांना प्रवासादरम्यान नैसर्गिक विधीची सोय व्हावी या दृष्टीने देण्यात येत आहे. सदर थांब्यांवर प्रवाशांना खाण्यापिण्याची सोय व्हावी हा मूळ हेतू नसून ही बाब दुय्यम आहे असे विषयांकित धोरणामध्ये नमूद केले आहे. मात्र राज्य परिवहन महामंडळाच्या राज्यातील प्रत्येक बसस्थानकावर प्रशस्त व स्वच्छ असे स्वच्छतागृह प्रवाशांना उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. त्यामुळे बस स्थानकांव्यतिरिक्त प्रवाशांना नैसर्गिक विधीची सोय करून देण्याची अजिबात आवश्यकता नाही. त्यामुळे विषयांकित धोरण तात्काळ रद्द करण्यात यावे.

४) राज्य परिवहन मंडळाचा महसूल वाढण्याच्या दृष्टीने विषयांकित धोरण तयार करण्यात आलेले आहे. परंतु प्रवाशांचा प्रवासादरम्यान विनाकारण वेळ वाया जात असल्याने अशाप्रकारे विसंगत धोरण राबवून महामंडळाला महसुली उत्पन्न वाढवण्यासाठी विषयांकित धोरण राबविण्यात येणार नसल्याने हे धोरण तात्काळ रद्द करण्यात यावे. कारण राज्य परिवहन महामंडळाच्या राज्यातील प्रत्येक बसस्थानकावर विविध आस्थापनांसाठी हॉटेल उपहारगृह व अन्य प्रयोजनांसाठी बसस्थानकातील गाळे भाडेतत्त्वावर देण्यात आलेले आहेत. या माध्यमातून परिवहन महामंडळाला गेल्या अनेक वर्षांपासून लाखो रुपयांचे उत्पन्न मिळत आहे. त्यामुळे विषयांकित हॉटेल मॉटेल धोरण हे तात्काळ रद्द करण्यात यावे.

५) विषयांकित हॉटेल मॉटेल धोरणाविषयी एसटी प्रेमी प्रवाशांमध्ये अतिशय तीव्र नाराजी असल्यामुळे अनेक प्रवासी नाईलाजास्तव खाजगी वाहनाने प्रवास करतात. त्यामुळे एसटी महामंडळाचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान देखील होत आहे. वरील सर्व कारणांचा आपण गांभीर्यपूर्वक विचार करावा व विषयांकित हॉटेल मॉटेल धोरण तात्काळ रद्द करण्यात यावे, अशी मागणी अभय ललवाणी यांनी निवेदनात केली आहे. प्रवाशांसाठी अतिशय गैरसोयीच्या असलेल्या या धोरणाविरोधात राज्यव्यापी आंदोलन उभारण्याची आवश्यकता असून यासाठी एसटी प्रेमी प्रवासी संघटनांनी पुढे यावे असे आवाहन अभय ललवाणी यांनी केले आहे.

## सिल्लोड तहसीलचा कारवाईचा बडगा फक्त कागदावरच

सिल्लोड प्रतिनिधी : सिल्लोड तालुक्यातील १५ स्टोन क्रेशर मालकांनी परवानगीपेक्षा जास्त गौण खनिज उपसा केला असून, महसूल विभागाने त्यांच्यावर ४० कोटी २१ लाख ८० हजार ८०० रुपयांचा दंड ठोठावला. मात्र, या कारवाईला नऊ वर्षे उलटली तरी एक रुपयाही वसूल झालेला नाही. त्यामुळे महसूल विभागाची कारवाई केवळ कागदावरच राहिल्याची चर्चा आहे.

काही वर्षांपूर्वी तालुक्यात २३ व्यावसायिकांनी १६ ठिकाणी खदानीसाठी शासनाची परवानगी घेतली होती. काही क्रशर चालकांनी परवानगीपेक्षा जास्त खोदकाम करून मोठ्या प्रमाणात गौण खनिजाची चोरी केली. ही बाब शासनाच्या निदर्शनास आली. त्यानंतर जिल्हा गौण खनिज अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत खदानींची पाहणी झाली. ईटीएस प्रणालीद्वारे मोजणी करून अहवाल वरिष्ठ कार्यालयात पाठवण्यात आला. या अहवालावरून पळशी, केऱ्हाळा, लिहाखेडी, पालोद, रजाळवाडी, मंगरूळ, तळणी, बाळापूर, लिहा आणि भवन या गावांतील १५ क्रशर मालकांवर दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात आली. मात्र, इतक्या वर्षांत महसूल विभाग दंड वसूल करण्यात अपयशी ठरला.

तालुक्यात अजूनही मोठ्या प्रमाणात गौण खनिजाची चोरी सुरू आहे. काही चोर सापडले तरी त्यांच्यावर कारवाई होत नाही. दंड ठोठावलेले क्रशर मालक आठ-नऊ वर्षांपासून पैसे भरत नाहीत. यामागे राजकीय वरदहस्त असल्याचा आरोप भाजपचे माजी तालुकाध्यक्ष सुधाकर सोनवणे यांनी केला आहे. महसूल प्रशासनावर राजकीय दबाव असल्यामुळे पुढील कारवाई होत नसल्याचे त्यांनी सांगितले.

## एमजीएम कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी

छत्रपती संभाजीनगर : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत घेण्यात आलेल्या आंतर-महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा आणि युवक महोत्सवात एमजीएम कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत विविध विभागांत चमकदार यश मिळवले.

बास्केटबॉल मुलींच्या खेळात वैष्णवी शिरसाठ, सुप्रिया गुलभिले, सुप्रिया काळे आणि वैष्णवी काकडे यांनी आंतर-महाविद्यालयीन स्पर्धेत बाजी मारत विद्यापीठ संघात निवड मिळवली. व्हॉलीबॉलमध्ये जितेश अडे, रणजीत मुळे आणि रोहित सोनुने यांनीही विद्यापीठ संघात स्थान निश्चित केले.

सांस्कृतिक विभागामध्येही महाविद्यालयाने आपला ठसा उमटवला. दीपक राखे यांनी अभिनय क्षेत्रात उत्तुंग यश मिळवत कृषितरंग युवक महोत्सव २०२५च्या निवड चाचणीत स्थान पटकावले. तसेच ते महाराष्ट्र राज्य आंतर-विद्यापीठ इंद्रधनुष्य युवक महोत्सव २०२५-२६ येथे एकपात्री अभिनय प्रकारात विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

आगामी महाराष्ट्र राज्य आंतर-विद्यापीठ क्रीडा स्पर्धा २०२५-२६ मध्येही परभणी विद्यापीठाच्या बास्केटबॉल संघातून याच चार विद्यार्थिनींची निवड झाल्याने महाविद्यालयाच्या गुणवत्तापूर्ण क्रीडा संस्कृतीचा प्रत्यय आला.

या सर्व यशाबद्दल संस्थेचे सचिव अंकुशराव कदम, एमजीएम हिल्स कृषि परिसराचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रवीण सूर्यवंशी, संचालक डॉ. धापके तसेच प्राचार्य डॉ. नरेंद्रसिंग चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कामगिरीमागे क्रीडा व सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. सचिन देसाई यांचे मार्गदर्शन आणि प्रयत्न महत्त्वाचे ठरले. महाविद्यालयातील सर्व पदाधिकारी व कर्मचाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून सन्मान व्यक्त केला.

### संजय जोहरे सोयगांवकर यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित

## शिक्षकांनी विदयार्थ्यांना शांततेचा संदेश देणारे शिक्षण दयावे- व्हिक्टोरिया मुत्तुम

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ नोव्हेंबर : श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था,कोल्हापूर संचलित सरदार रघुनाथराव ढवळे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,केंदूरचे कलाशिक्षक संजय जोहरे सोयगांवकर यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय व अल्पसंख्यांक शिक्षक-शिक्षकेत्तर संघटना,महाराष्ट्र राज्य यांचेकडून सन २०२५ चा राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.




डॉ.बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन,पुणे येथे जागतिक शिक्षक दिन चे दिवशी आयोजित एका दिमाखदार पारितोषिक वितरण कार्यक्रमात केंदूरचे उपक्रमशील कलाशिक्षक संजय जोहरे यांनी कला,सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या कार्याबद्दल व्हिक्टोरिया मुत्तुम (आंतरराष्ट्रीय शांताता शिक्षण विभागाच्या भारतातील संचालक) यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी व्हिक्टोरिया मुत्तुम यांनी शिक्षकांसमोर आपले विचार मांडतांना शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सर्व विषयांसोबत शांततेचेही शिक्षण दयावे व जगात शांतता निर्माण होण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

कलाशिक्षक संजय जोहरे सोयगांवकर यांना यापूर्वी पुणे जिल्हा कलाशिक्षक संघ, मुख्याध्यापक संघ,माध्यमिक शिक्षक संघ,डॉ. बाबासाहेब आंबेडकर कार्यकारी समिती यांचेकडून जिल्हास्तरीय पुरस्कार महाराष्ट्र शिक्षक पॅनल यांचेकडून राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार तसेच आर्ट बिटस् फाऊंडेशन,पुणे यांचेकडून राष्ट्रीय पातळीवरील बेस्ट आर्ट टिचर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी व्हिक्टोरिया मुत्तुम,राहुल मोरे,दिपक चौने, रावसाहेब मिरगणे,घनश्याम भोसले, वैभव गीते,संघटनेचे अध्यक्ष संतोष गायकवाड,सचिव सत्यजित जानराव, संजय चौधरी,शिक्षक प्रशांत गांजरे.मनोज दोंड उपस्थित होते.

## श्री मोहटादेवी विद्यालयात हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली



तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १७ नोव्हेंबर पैठण तालुक्यातील श्री मोहटादेवी विद्यालय म्हारोळा येथे हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या पुण्यतिथीनिमित्त वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या पुण्यतिथीच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून भैरवनाथ शिक्षण संस्थेचे वर्तमान अध्यक्ष डॉक्टर धनंजय अशोक मुखेकर हे लाभले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हिंदी आणि क्रीडा विभाग प्रमुख सुभाष गवई यांनी केले. कार्यक्रमांमध्ये पाचवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रम यशस्वीतेसाठी विद्यालयाचे सहकारी दीपक कर्डिले, ज्योती गायकवाड, सतीश मुखेकर, अंजुम पठाण, शंकर शिरसाठ, बद्री धरपळे, यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार विद्यालयाचे मुख्याध्यापक महेश घोरतळे यांनी मानले. बाळासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात पर्यटन क्लबचे उद्घाटन




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१७ नोव्हेंबर : येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.१५ शनिवार रोजी पर्यटन क्लबचे उद्घाटन करण्यात आले.यावेळी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार तर प्रमुख उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे उपस्थिती म्हणून महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ.श्रीकृष्ण परिहार आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयांमध्ये पर्यटन क्लबचे उद्घाटन करण्यात आले. त्याप्रसंगी प्रमुख उपस्थित डॉ. श्रीकृष्ण परीहार यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक,विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांना पर्यटन क्लब संदर्भात मार्गदर्शन केले. यानंतर अध्यक्षीय समारोप प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी पर्यटनातील विविध संधी याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शिवाजी अंभोरे,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.निलेश गावडे, डॉ. सुनील चौधरे,डॉ.पंकज गावीत महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, कार्यक्रमाधिकारी डॉ.निलेश गावडे, डॉ.पंकज गावित,डॉ.सुनील चौधरे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## हिवाळ्याचे स्वागत करण्यास सेलिब्रिटी सज्ज

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - हिवाळा सुरू होताच एण्ड टीव्हीवरील लोकप्रिय अभिनेत्री उबदार कपडे, स्किनकेअर आणि आवश्यक ॲक्सेसरीजसह थंडीतही शूटिंगदरम्यान ताजेतवाने राहण्याची तयारी करत आहेत. दीर्घकाळ चालणाऱ्या शूटिंगमध्ये स्वतःला आरामदायी आणि सुसज्ज ठेवण्यासाठी त्या आपल्या बॅगेत नेहमी ठेवणाऱ्या महत्त्वाच्या वस्तूंबद्दल सांगत आहेत.

आगामी मालिका घरवाली पेडवाली मधील सावीची भूमिका साकारणारी सीरत कपूर म्हणाल्या की हिवाळ्यात त्वचा कोरडी पडू नये म्हणून त्या नेहमी मॉइश्चरायझर, लिप बाम आणि फेशियल मिस्ट सोबत ठेवतात. थंडी वाढल्यावर गरम हर्बल टी ऊर्जा देते म्हणून त्या हर्बल चहाचे पॅक्सही सोबत बाळगतात.

हप्पू की उलटन पलटन मधील राजेश म्हणजेच गीतांजली मिश्रा सांगतात की थंडीत सतत मेकअपमुळे हात कोरडे होतात म्हणून हातांसाठी क्रीम, मऊ मफलर, टिश्यू पेपर आणि बदाम-अक्रोड यांसारखे स्नॅक्स त्या बरोबर ठेवतात. थंडीवर मात करण्यासाठी लहान गरम पाण्याची बाटलीही त्यांच्याकडे असते.

भाबीजी घर पर हे मधील अंगूरी भाबी शुभांगी अत्रे सांगतात की हिवाळ्यात उबदार मोजे आणि कोमट पाण्याने भरलेली बाटली त्यांना सेटवर ऊर्जा देतात. ताजेतवाने राहण्यासाठी त्या हलका परफ्यूम रोल-ऑनही सोबत ठेवतात.

अभिनेत्रींच्या या छोट्या पण उपयुक्त गोष्टींमुळे हिवाळ्यातील दीर्घकाळ शूटिंग अधिक सहज आणि उत्साहवर्धक होते.

## आधुनिकतेचा सुंदर संगम असलेला 'प्रथा' संग्रह सादर

भारतीय विवाहसोहळ्यांच्या हंगामाची सुरुवात होत असताना, भारतातील सर्वात विश्वासार्ह पारंपरिक दागिन्यांच्या ब्रँडपैकी एक असलेल्या 'पीएनजी ज्वेलर्स'ने आपला खास असा विवाह संग्रह 'प्रथा' सादर केला आहे. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश आणि गोवा येथे या संग्रहाचा ग्राहकांना अनेक सवलतींसह लाभ घेता येणार आहे. हा संग्रह नव्या युगातील वधूसाठी परंपरेचा आणि आधुनिकतेचा सुंदर संगम आहे. 'प्रथा' म्हणजेच 'परंपरा'. हा संग्रह भारतीय स्त्रीच्या सौंदर्य, भावना आणि कलात्मकतेचे प्रतिनिधित्व करतो. या नव्या कलेक्शनमध्ये सोने आणि हिरे जडित सुंदर ब्रायडल सेट्स, हार, कानातले, बांगड्या आणि मांगटिका यांचा समावेश आहे.

## सीओपीडी हा एक दीर्घकालीन श्वसन रोग : डॉ. आशिष देशमुख

छत्रपती संभाजीनगर : क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज (उजझऊ) (सीओपीडी) हा एक दीर्घकालीन श्वसन रोग आहे जो धूरके, धूर, धूळ किंवा रसायने, ज्यामध्ये सामान्यतः सिगारेटचा धूर असतो, यांच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्याने फुफ्फुसांना नुकसान होते. या नुकसानामुळे हवेच्या प्रवाहात अडथळा निर्माण होतो जो कालांतराने वाढू शकतो, ज्यामुळे श्वास घेणे अधिक कठीण होते.

सल्लागार आणि इंटरव्हेंशनल पल्मोनोलॉजिस्ट डॉ. आशिष देशमुख सांगतात, ग्लोबल बर्डन ऑफ डिसीज २०१९ च्या अभ्यासानुसार, सीओपीडी सुमारे ५५ दशलक्ष लोकांवर प्रभाव पाडू शकते आणि भारतातील मृत्यूचे प्रमुख दुसरे कारण आहे. असे असूनही, अनेकांना या आजाराची माहिती नाही; नुकत्याच झालेल्या एका अभ्यासात असे आढळून आले आहे की सीओपीडीचे निदान झालेल्या ५४% रुग्णांना या आजाराबद्दल काहीच माहिती नव्हती.

या वर्षीच्या जागतिक सीओपीडी दिनाची थीम तुमच्या फुफ्फुसांचे कार्य जाणून घ्या मध्ये फुफ्फुसांचे आरोग्य समजून घेणे आणि त्यांचे मोजमाप करणे या महत्त्वावर भर देण्यात आला आहे. यामध्ये ज्यांना सीओपीडी हा आजार आहे आणि धोका आहे, त्यांनी सीओपीडीसारख्या दीर्घकालीन श्वसन रोगांबद्दल जागरूक असणे आणि त्याबद्दल त्यांना चांगली समज असणे याचा समावेश आहे.

सीओपीडी होण्याचा धोका कोणाला असू शकतो?

साधारणपणे वय वर्षे ४० पेक्षा जास्त असणाऱ्या लोकांना हा आजार होत असला तरी, जास्त धूम्रपान करणाऱ्या किंवा धुराच्या आणि प्रदूषकांच्या संपर्कात येणाऱ्या तरुणांवरही सीओपीडीचा परिणाम होऊ शकतो. धूम्रपान हा आता एकमेव जोखीम घटक राहिलेला नाही;


शहरी वायू प्रदूषण, सेकंडहँड स्मोक, व्यावसायिक संपर्क (उदा. शेती), आणि घरातील प्रदूषके (डासांची कॉइल, धूप) यांची देखील भूमिका महत्वाची ठरते.

अगदी सौम्य लक्षणांमुळे देखील सीओपीडीच्या प्रादुर्भावाचा सुरवातीचा काळ लक्षात येऊ शकतो ज्यामुळे गुंतागुंत टाळण्यासाठी त्वरित वैद्यकीय मदत घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. सीओपीडीची तीव्रता - काही दिवस ते आठवडे टिकणारे लक्षणे वाढण्याचा काळ - बहुतेकदा संसर्ग किंवा प्रदूषकांमुळे, धाप लागणे, खोकला येणे, सतत थुंकी येणे आणि कधीकधी हृदय आणि श्वासोच्छवासाची गती वाढल्याने उद्भवते.

सीओपीडीचे निदान लवकर होऊन त्यावर उपचार होणे का महत्त्वाचे आहे?

सीओपीडीचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि जीवनमान सुधारण्यासाठी लवकर निदान होणे आणि त्यावर उपचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहेत. रोग आणि त्याची सुरुवातीची लक्षणे ओळखणे हे पहिले पाऊल आहे. चांगल्या परिणामांसाठी वेळेवर वैद्यकीय मदत घेणे आणि उपचारांचे पालन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आरोग्यसेवा व्यावसायिकांच्या मदतीमुळे आणि जीवनशैलीत बदल केल्यामुळे, सीओपीडी असलेले लोक चांगला श्वासोच्छवास, चांगले आयुर्मान आणि आरोग्य मिळवू शकतात.

## डॉ अनुपम टाकळकर यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य सहसचिवपदी निवड



छत्रपती संभाजीनगर- छत्रपती संभाजीनगर येथील त्वचारोग तज्ज्ञ डॉ अनुपम टाकळकर यांची इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य सहसचिवपदी २०२५ ते २०२६ या कार्यकाळासाठी निवड झाली आहे. सोलापूर येथे झालेल्या राज्य परिषदेतील पदग्रहण सोहळ्यात ही घोषणा करण्यात आली.

या कार्यक्रमाला सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ सचिन ओंबासे, मुंबईच्या जे जे रुग्णालयाचे माजी अधिष्ठाता डॉ सुधीर नणदकर, आयएमएचे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ हौसी कपड़िया, राष्ट्रीय सहसचिव डॉ हेमंत लुंगे, मावळते राज्याध्यक्ष डॉ संतोष कदम, माजी सचिव डॉ अनिल आव्हाड आणि भावी अध्यक्षा डॉ मंजुषा गिरी उपस्थित होते. अध्यक्षपदी डॉ संतोष कुलकर्णी आणि सचिवपदी डॉ विक्रांत देसाई यांनी पदभार स्वीकारला.

डॉ टाकळकर यांची राज्य सहसचिवपदाबरोबरच आयएमए मुख्यालयाच्या सेंट्रल वर्किंग कमिटी सदस्य म्हणूनही निवड झाली आहे. आपल्या निवडीबद्दल ते म्हणाले की संघटनेने दाखवलेल्या विश्वासाचे उत्तर प्रभावी कामाद्वारे देण्याचा प्रयत्न करणार असून सदस्यांच्या हितासाठी ठोस निर्णय घेण्यास प्राधान्य देणार आहेत.

याच परिषदेत छत्रपती संभाजीनगर येथील डॉ यशवंत गाडे यांची इलेक्शन कमिशन सदस्य आणि सेंट्रल वर्किंग कमिटी सदस्य म्हणून निवड झाली. जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडून निष्पक्षपणे काम करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच शहरातील डॉ राजेंद्र गांधी यांचीही सेंट्रल वर्किंग कमिटी सदस्य म्हणून निवड झाल्याने संभाजीनगरच्या वैद्यकीय क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

## अग्रलेख...

# आत्मपरीक्षण करणार का?

दिवस होता ६ ऑगस्ट २००४. फोरम फॉर डेमोक्रॅटिक इनिशिएटिव्ह या सामाजिक संस्थेची बैठक सुरू होती. बैठकीत तत्कालीन काँग्रेस सरकारच्या दृष्टीने नामांकित असलेली डोकी उपस्थित होती. ही डोकी होती न्या. राजिंदर सच्चर, दीपंकर भट्टाचार्य, सेरम रोजेश आणि प्रा. एस. ए. आर गिलानी यांची. सच्चर समितीचे नाव सर्वांनाच माहीत आहे. दहशतवादी, नक्षलवादी आणि ईशान्य भारतातील बंडखोरांची बाजू घेणारे म्हणून सच्चर यांची ओळख आहे. मुस्लिमांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक अवस्थेचा अभ्यास करण्यासाठी डॉ. मनमोहनसिंग यांच्या नेतृत्वातील काँग्रेस सरकारने राजिंदर सच्चर यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समिती स्थापन केली. वास्तविक पाहता एखाद्या सर्वोच्च समितीचा अध्यक्ष नेमताना त्याचा भूतकाळ पाहणे आवश्यक असते. पण, बहुसंख्य हिंदूंना डावलण्यासाठी आणि त्यांचे मानसिक खच्चीकरण करण्यासाठी जे जे आवश्यक असते, ते करण्यात काँग्रेस सदैव अग्रेसर राहिली आहे. भारतीय जवानांची हत्या करणारा जम्मू-काश्मीर लिबरेशन फ्रंटचा म्होरक्या- जो सध्या तुरुंगात खडी फोडत आहे, त्या यासिन मलिकबरोबर राजिंदर यांचे फार सख्य होते. परकीय चलन घोटाळ्यात यासिन मलिकला अटक केली असता राजिंदर सच्चर यांनी २००२ मध्ये पत्रकार परिषद घेऊन यासिनच्या सुटकेची मागणी केली होती. एवढेच नव्हे तर जम्मू-काश्मीरला १९५३ पूर्वीचा दर्जा बहाल करावा, अशी वारंवार मागणी केली होती. ही देशविरोधी व्यक्ती जर सच्चर समितीची अध्यक्ष असेल तर काय होईल, याचा विचारच न केलेला बरा. दीपंकर भट्टाचार्य हे कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्स व लेनिनवादी) या संघटनेचे महासचिव. नक्षलवाद्यांना पाठिंबा देणारा हा पक्ष आहे. सेरम रोजेश हा मणिपूरमधील बंडखोरांचा नेता, तर दिल्ली विद्यापीठात काम केलेला प्राध्यापक एस. ए. आर. गिलानी याचा तर संसदेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात सहभाग होता. याच हल्ल्यातील दोषी अफजल गुरूला फाशी झाल्यानंतर गिलानीला खूप दु:ख झाले होते. एवढेच नव्हे तर काश्मिरात गिलानी अफजल गुरूला श्रद्धांजली वाहण्यासाठी सभाही आयोजित करीत होता. अशाच एका प्रकरणात गिलानीला २०१६ मध्ये अटकही झाली होती.

राजिंदर सच्चर आणि फोरम फॉर डेमोक्रॅटिक इनिशिएटिव्हसारख्या अनेक संस्था आणि व्यक्ती मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य, या नावाखाली देशात फुटीरतावादाला खतपाणी घालत आहेत. हे समूह आणि व्यक्ती अशा प्रकारचे वातावरण देशात तयार करीत असतात, की ज्या वातावरणात देशविघातक विचार जन्माला येतात. ज्याचे परिणाम देशाला, विशेषतः बहुसंख्य हिंदू समाजाला भोगावे लागत आहेत. आणि काँग्रेस, डावे पक्ष, समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता दल, तृणमूल काँग्रेस, डीएमके, आम आदमी पार्टीसारखे पक्ष राजकीय फायदा मिळविण्यासाठी अशा समाज आणि देशविरोधी तत्त्वांवर पांघरूण घालण्याचे काम करीत असतात. दहशतवादविरोधी कायदा म्हणजे मुस्लिमविरोधी कायदा असा समज देशात पसरविण्यात हेच राजकीय पक्ष आणि तथाकथित सामाजिक संस्था सर्वांत पुढे असतात. २००१ मध्ये भारताच्या संसदेवर भीषण दहशतवादी हल्ला झाल्यानंतर २००२ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने 'पोटा' कायदा आणला. पण, २००४ मध्ये काँग्रेसचे सरकार येताच 'पोटा' कायदा रद्द करण्यात आला. हा कायदा रद्द करण्यासाठीही राजिंदर सच्चर यांनी आंदोलन केले होते. अर्थात, काँग्रेस आणि हिंदूविरोधी भूमिका घेणारे काही प्रादेशिक पक्ष धर्माच्या आधारावर देशद्रोही आणि गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचे काम करीत असतात. विशेष म्हणजे या सर्वांची एक इको सिस्टिम तयार झालेली आहे. ते पद्धतशीरपणे वातावरण निर्मिती करीत असतात. दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठात नुकत्याच झालेल्या निवडणुकीत डाव्या विचारांच्या विद्यार्थी संघटनेचा विजय झाला. विजय झाल्यानंतर त्यांनी जी नारेबाजी केली त्यावरून भविष्यात हे तरुण-तरुणी देशासाठी डोकेदुखी ठरणार हे निश्चित आहे. असाच एक समज (नॅरेटिव्ह) देशात पसरविला जात आहे आणि तो म्हणजे गरिबी, अशिक्षितपणा आणि अन्याय, यामुळे युवक-युवती गुन्हेगारीकडे वळतात, दहशतवादी होतात. पण, अलिकडच्या दिल्ली बॉम्बस्फोटात जे आरोपी आहेत, ते सर्व उच्चशिक्षित आहेत. प्रसंगी देवापेक्षाही समाज ज्यांच्यावर अधिक विश्वास ठेवतो, असे डॉक्टर आहेत. यावरून हे सिद्ध होते की दहशतवादी होण्यासाठी गरिबी, अशिक्षित असण्याची मुळीच गरज नाही. देशात आतापर्यंत जेवढे काही दहशतवादी हल्ले झाले आहेत, त्यामागे फक्त आणि फक्त धर्मांधता कारणीभूत आहे. गरिबी आणि अशिक्षितपणा ही गुन्हेगार, दहशतवादी होण्याची कारणे असतील तर आज गल्लोगल्ली हिंसाचार माजला असता. दिल्लीत १३ निष्पाप नागरिकांचा जीव घेणारे दहशतवादी हे उच्चशिक्षित आहेत आणि त्यांनी अत्यंत नियोजितपणे, थंड डोक्याने हा हल्ला घडविला. अल-फलाह विद्यापीठाला आश्रयस्थान बनवून त्यांनी कट आखला. डॉ. मुजम्मिल शकील याला तर महिन्याला पाच लाख रुपये वेतन मिळत होते. मुजम्मिल हा विद्यापीठात प्राध्यापक होता. स्वत:ला स्फोटात उडविणारा डॉ. उमर नबीकडेही पैशाची उणीव नव्हती. विशेष म्हणजे बहुतांश दहशतवादी हे काश्मीर खोऱ्यातील आहेत. नोकरी लागल्यानंतर त्यांनी आलिशान घरे बांधली. घरच्यांना संपत्ती गोळा करून दिल्यानंतर हे दहशतवादी धर्मकार्याकडे वळले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे आपला मुलगा, भाऊ हे निर्दोष असल्याचा कांगावा नातेवाईक करीत असतात. कारण, त्यांना जाणीव आहे, की एक मुलगा धर्मासाठी मेला तरी काही फरक पडणार नाही. मरणाऱ्याला हुतात्मा मानून त्याला जन्नती समजतात. दिल्ली बॉम्बस्फोटात डॉ. शाहीनचा सहभाग असल्याचे उघड झाले. तिचे कनेक्शन थेट पाकिस्तानातील बहावलपूर येथे आढळून आले. जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेचा म्होरक्या मसूद अजहर याची बहीण सादिया अजहरने जमात-उल- मुमिनत नावाची महिलांची दहशतवादी संघटना स्थापन केली. तिची आणखी एक बहीण समैरा ही दहशतवादी कसे बनावे यासाठी ऑनलाईन वर्ग घेत असते. लखनौची रहिवासी असलेली डॉ. शाहिना शाहीद ही सादियाच्या संपर्कात आली आणि तिला भारतातील महिला विंगचे प्रमुख नेमले, अशी माहिती तपासातून पुढे आली आहे. याच शाहिनाच्या कारमध्ये एके-४७ रायफल आणि स्फोटके आढळून आलीत. यावरून देश हादरविण्याचा मोठा कट या शिक्षित दहशतवाद्यांनी आखल्याचे सिद्ध होते. या कटाची माहिती तपास संस्थांना वेळेवर मिळाली म्हणून बरे झाले. अन्यथा, देशभरात प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी तब्बल ३२ बॉम्बस्फोट घडविण्याचा कट या डॉक्टरांनी आखला होता. या सर्वांचा मास्टरमाईंड हा श्रीनगरमधील नौगाव येथील मशिदीचा मौलवी- इरफान अहमद याने डॉक्टरांची माथी भडकावून त्यांना दहशतवादाकडे वळविले. वास्तविक पाहता मौलवीचे काम हे नागरिकांना योग्य मार्गदर्शन करणे हे होय. मात्र, या इरफानने डॉक्टरांची दहशतवादी फौज तयार केली. दिल्लीतील स्फोटानंतर अल-फलाह विद्यापीठातून १५ डॉक्टर्स गायब झाले आहेत. दहशतवादी तयार होणे हे देशासाठी घातक तर आहेच; शिवाय मुस्लिम धर्म आणि समाजासाठी अत्यंत घातक आहे. असे कृत्य केल्याने कुणाच्याही पदरात विनाशाशिवाय काहीही पडणार नाही. आज, उच्चशिक्षित असलेले डाक्टर्स तुरुंगात गेले आहेत. त्यांची नोंदणी रद्द केल्याने आतापर्यंत केलेले श्रम आणि पैसा वाया गेला आहे. तपास संस्थांची छापेमारी अजूनही सुरूच असून, ६०० पेक्षा जास्त संशयितांची चौकशी सुरू आहे. एवढेच नव्हे तर काश्मिरातील जवळपास २०० डॉक्टर्स तपास संस्थांच्या रडारवर आहेत. दिल्लीतील बॉम्बस्फोटात १३ कुटुंबे उद्ध्वस्त झालीत. त्यात हिंदूंबरोबरच मुस्लिमांचाही समावेश आहे. मुले काय करतात, याकडे लक्ष देण्याची जबाबदारी घरच्यांची तर आहेच, आणि समाजाचीही तेवढीच आहे. काही वाईट घडत असेल तर त्यापासून समाज स्वत:ला दूर ठेवू शकत नाही. या घटनेमुळे फक्त काही व्यक्ती आरोपी ठरलेले नाहीत; एक अख्खा समुदाय त्यातील सुशिक्षित वर्गासह संशयाच्या घेऱ्यात आलाय. याही वेळी याची जबाबदारी इतरांच्याच डोक्यावर टाकायची, की आत्मपरीक्षण करून देशाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हायचे याचा निर्णय करण्याचा हा प्रसंग आहे.

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# मुनीर यांची स्फोटक सलामी!

इस्लामाबादमध्ये पाकिस्तानी संसदेच्या वरिष्ठ सभागृहात १० नोव्हेंबर रोजी मुनीर नावाचा 'भस्मासुर' तयार केला जात असतानाच नवी दिल्लीत लाल किल्ला परिसरात झालेल्या कार बॉम्बस्फोटात दहा निष्पाप नागरिक ठार झाले. विशेष म्हणजे भारताचे पंतप्रधान मागील ७८ वर्षांपासून ज्या लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवित, राष्ट्राला संबोधित करतात, त्याच लाल किल्ल्याच्या परिसरात रक्ताचा जणू सडा शिंपडण्यात आला. हा योगायोग नव्हता. फिल्ड मार्शल मुनीर यांनी भारताला आणखी एका युद्धासाठी दिलेली चिथावणी होती.

**तारीख आणि वेळ** : १० नोव्हेंबर रोजी पाकिस्तानी संसदेने एक वादग्रस्त असे २७ वे घटनादुरुस्ती विधेयक पारित केले. साधारणत: सायंकाळी ६.३० च्या सुमारास हे विधेयक मंजूर करण्यात आले. आणि इकडे नवी दिल्लीत १० नोव्हेंबर रोजीच सायंकाळी ६.५२ वा. बॉम्बस्फोट करण्यात आला. या घटना दुरुस्तीत फिल्ड मार्शल असिम मुनीर यांना प्रचंड अधिकार देण्यात आले आहेत. त्यांना आजन्म 'फिल्ड मार्शल' हा किताब ठेवता येणार आहे. पाकिस्तानमध्ये आता असिम मुनीर हे सर्वांत शक्तिशाली व्यक्ती ठरले आहेत. आणि याच मुनीर यांच्या मार्गदर्शनाखाली नवी दिल्लीत लाल किल्ल्यासमोर बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आला.

**पाकिस्तानच...** : सोमवारी १० नोव्हेंबरच्या सायंकाळी झालेल्या या बॉम्बस्फोटाबाबत दोनच शक्यता होत्या. एक तर कारमध्ये असलेल्या सीएनजी सिलेंडरचा स्फोट झाला वा मग पाकिस्तानने तो घडवून आणला असावा. बॉम्बस्फोटाची तीव्रता पाहता सीएनजी सिलेंडर स्फोटाची पहिली शक्यता सुरक्षा तज्ज्ञांनी फेटाळून लावल्यानंतर यामागे पाकिस्तानचाच हात आहे हे स्पष्ट झाले.

**मुनीरच्या धमक्या** : पाकिस्तानी लष्करप्रमुख मागील काही महिन्यांपासून सतत भारताला धमक्या देत आहेत. मुनीर यांची अमेरिकेतील भाषणे असोत की पाकिस्तानी लष्करी अकादमीतील भाषणे, त्यांनी सातत्याने भारतविरोधी भूमिका घेतली आहे. नवी दिल्लीत घडवून आणण्यात आलेल्या या बॉम्बस्फोटात मुनीर यांच्या त्या मानसिकतेचे प्रतिध्वनी उमटले आहेत.

**मुनीर यांचा डंका** : भारताने ऑपरेशन सिंदूर चार दिवसात संपवून एक मोठी चूक केली असे आता वाटते. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानचे कंबरडे मोडण्याचा निर्णय भारताने घ्यावयास हवा होता पण, भारताने संयम दाखवीत ऑपरेशन सिंदूर संपविले. यात पाकिस्तानला तडाखा देण्यात भारत यशस्वी झाला. असा दावा भारतीय वायुदलप्रमुख, सेनाप्रमुख यांनी केला असला तरी, अमेरिका, चीन, पाश्चिमात्य व मुस्लिम जगतात मात्र पाकिस्तानच्या विजयाचा डंका पिटण्यात आला. यात अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प आघाडीवर राहिले. त्यांनी जनरल मुनीर यांच्यासाठी व्हाईट हाऊसमध्ये लाल पायघड्या घातल्या. त्यांच्या सन्मानार्थ मेजवानी आयोजित केली. मुनीर यांच्या पराक्रमाचे ढोल पिटण्यात राष्ट्रपती ट्रम्प यांनीच पुढाकार घेतला. मग, चीन, मुस्लिम देशही मुनीर यांना मोठे करण्यासाठी सरसावले. आणि हे कथित यश आता जनरल मुनीर यांच्या अंगी संचारले आहे. पाकिस्तानी संसदेने १० नोव्हेंबर रोजी फिल्ड मार्शल मुनीर यांना शक्तिशाली करण्याचा निर्णय घेतला असताना, मुनीर आपल्या या शक्तीचे प्रदर्शन करणार होते. त्यासाठी त्यांनी १० नोव्हेंबरची निवड केली. लाल किल्ल्याची निवड केली आणि बऱ्याच वर्षांच्या कालखंडानंतर नवी दिल्लीत एक मोठा दहशतवादी हल्ला घडवून आणला.

**भारतासमोरील पर्याय** : फिल्ड मार्शल मुनीर यांच्या या दु:साहसानंतर भारत त्यांना कोणते व कसे उत्तर देतो हे महत्त्वाचे ठरणार आहे. भारताने पाकिस्तानच्या विरोधात लहान मोठी लष्करी कारवाई केल्यास, पाकिस्तान त्याला केवळ प्रत्युत्तर देणार नाही, तर पाकिस्तानचे उत्तर कितीतरी प्रमाणात मोठे असेल असेही मुनीर यांनी स्पष्ट केले आहे. याचाच अर्थ पाकिस्तानने भारताशी युद्ध करण्याचा निर्णय अगोदरच घेतलेला आहे. मुनीर यांना जणू युद्धज्वर चढला आहे. असे त्यांच्या विधानांवरून व कृतीवरून दिसत आहे.

**हा तर प्रारंभ** : नवी दिल्लीत घडवून आणलेला बॉम्बस्फोट हा पाकिस्तानच्या 'नव्या व्यूहरचनेचा' प्रारंभ मानला जातो. पाकिस्तानला काश्मीर खोऱ्यात रक्तपात करावयाचा नाही. याने खोऱ्यातील काश्मिरी जनतेची सहानुभूती आपण गमावू याची पाकिस्तानला पूर्ण कल्पना आहे. त्यामुळे मागील काही वर्षांपासून पाकिस्तानने काश्मीर खोऱ्यातील दहशतवादी कारवाया बंद केल्या आहेत. पहलगाम त्याला एक अपवाद होता. हा एक अपवाद वगळता पाकिस्तानने जम्मूच्या पूंछ, राजौरी या भागावर आपले लक्ष केंद्रित केले होते. यात भारतीय सुरक्षा दलाच्या जवानांना 'लक्ष्य' करण्याचे धोरण पाकिस्तान राबवीत होता. या भागाची भौगोलिक दुर्गमता लक्षात घेता येथील चकमकी ८-८ दिवस लांबविण्यात पाकिस्तानला यश येत होते.

**ऑपरेशन सिंदूरनंतर** : ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताने पाकिस्तानला पुरेसा चोप दिला नाही. याने जनरल मुनीर व पाकिस्तानी नेत्यांचे मनोबल वाढले. त्यास जगातील इतर देशांची साथ मिळाली आणि आता मुनीर नावाचा भस्मासुर पाकिस्तानात तयार झाला आहे.

**घटनात्मक उठाव** : पाकिस्तानात आता असिम मुनीर यांची सत्ता चालणार हे २७व्या घटना दुरुस्तीने दाखवून दिले आहे. या देशात अनेकदा लष्करी उठाव झाला आहे. राज्यघटनेला पायदळी तुडवीत लष्करी सेनापतींनी देशाची सत्ता आपल्या हाती घेतली आहे. यावेळी घटना पायदळी न तुडविता, घटनेची पायघडी घालून मुनीर यांना पाकिस्तानचे सर्वेसर्वा करण्यात येत आहे. यासाठी राज्यघटनेच्या कलम २४३ मध्ये दुरुस्ती करण्यात आली असून, मुनीर यांना चीफ ऑफ डिफेन्स फोर्सेस हे नवे पद बहाल करण्यात आले आहे. पाकिस्तानी लष्कर, वायुदल व नौदल या तिन्ही दलांना मुनीर यांच्या नेतृत्वाखाली काम करावे लागणार आहे. पाकिस्तानची आण्विक शस्त्रास्त्रे मुनीर यांच्या स्वाधीन करण्यात आली आहेत. हा सारा विषय माकडाच्या हाती कोलीत देण्यासारखा आहे. पण, या निर्णयावर पाकिस्तानी सिनेट व नॅशनल असेम्ब्ली या संसदेच्या दोन्ही सभागृहांनी शिक्कामोर्तब केले आहे.

**सुप्रीम कोर्टाचा सफाया** : या घटना दुरुस्तीत पाकिस्तानच्या सुप्रीम कोर्टाचाही सफाया करण्यात आला आहे. आता तेथे पाकिस्तान संविधान न्यायालय स्थापन केले जाणार असून, सारे घटनात्मक विषय हे न्यायालय हाताळणार आहे. विशेष म्हणजे पाकिस्तानचे हे नवे न्यायालय सर्वोच्च न्यायालयापेक्षा 'सर्वोच्च' राहणार आहे. या न्यायालयात नियुक्त होणाऱ्या न्यायधीशांना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांपेक्षा अधिक वेतन-भत्ते राहणार आहेत. पाकिस्तानच्या सर्वोच्च न्यायालयातील न्यायधीशांसाठी निवृत्तीचे वय ६५ वर्षांचे असताना, नव्या न्यायालयातील न्यायधीशांसाठी निवृत्तीची वयोमर्यादा ६८ करण्यात आली आहे. म्हणजे मुनीर यांच्यासाठी पाकिस्तानी लष्कर व पाकिस्तानची न्यायालये याची सारी व्यवस्थाच बदलण्यात आली आहे.

**मोठे आव्हान** : लाल किल्ल्यासमोर झालेल्या कार बॉम्बस्फोटाने भारतासमोर एक मोठे आव्हान उभे केले आहे. हा बॉम्बस्फोट घडवून आणणाऱ्यांना दंडित केले जाईल असे भारताने म्हटले आहे. यातील काही संशयितांना पकडण्यात आले असून, काहींना पकडण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यांना कठोर शिक्षाही केली जाईल. पण, हा बॉम्बस्फोट घडवून आणणाऱ्या 'मास्टरमाईंड'चे काय?

**मास्टरमाईंड** : फिल्ड मार्शल मुनीर यांच्या आदेशाने हा बॉम्बस्फोट घडवून आणण्यात आला याबाबत कुणालाही कोणतीही शंका असण्याचे कारण नाही. पण, ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानात व जगात मुनीर यांची प्रतिमा अचानक उंचावली आहे. याचे नेमके कारण सांगणे अवघड आहे. पाकिस्तानी सरकारने त्यांना 'फिल्ड मार्शल' किताब बहाल केला, चीन, अमेरिकेच्या गळ्यातील ताईत बनले. सौदी अरेबियाने मुनीर यांच्या 'कामगिरीवर' फिदा होत, पाकिस्तानशी सुरक्षा करार केला. आता केवळ औपचारिकता पूर्ण करण्यासाठी पाकिस्तानी संसदेत घटना दुरुस्ती पारित करवून मुनीर यांना शक्तिशाली करण्यात आले आहे. नवी दिल्लीत झालेला - घडवून आणण्यात आलेला बॉम्बस्फोट त्याचाच परिणाम होता. पण, एक दिवस मुनीर नावाचा भस्मासुर पाकिस्तानी नेत्यांच्या - जनतेच्या मानगुटीवर बसणार आहे. पण तोपर्यंत तो भारताला त्रस्त करणार यात शंका नाही. त्यामुळे भारत सरकार समोरील खरे आव्हान कार बॉम्बस्फोटातील चिल्लर आरोपींना पकडणे हे नाही तर फिल्ड मार्शल मुनीर यांचा युद्धज्वर उतरविणे हे राहणार आहे. भारत त्या दिशेने कोणती पावले टाकतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# थंडीतही तापले राजकीय वातावरण

नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या निवडणुका जाहीर झाल्याने सध्या थंडीचा पारा घसरला असला तरी राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ३१ जानेवारी २०२६ पूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर निवडणूक आयोगाने पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला. १७ नोव्हेंबर रोजी या निवडणुकांसाठी नामनिर्देशन दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. या निवडणुका पार पडताच महाराष्ट्रातील २९ महानगरपालिका आणि २६ जिल्हा परिषदांसह २८९ पंचायत समित्यांच्या निवडणुका होणार आहे. सध्या नगरपरिषदा आणि नगरपंचायती मिळून २८८ ठिकाणी निवडणूक जाहीर झाली असून २ डिसेंबर रोजी मतदान आणि ३ डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत ६ हजार ८४९ नगरसेवक आणि २८८ नगराध्यक्ष निवडले जातील. यावेळी तब्बल १ कोटी ७ लाखांवर मतदार आपला हक्क बजावतील.

ग्रामीण भागातही निवडणुकीचे वातावरण असून जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांसाठी अनेक ठिकाणी आरक्षण सोडत पूर्ण झाली आहे. अनेक ग्रामपंचायतींच्या निवडणुकाही प्रलंबित आहेत. परिणामी, विकासकामांत अनेक अडचणी येत आहे. कुठलाही प्रशासकीय अधिकारी सर्वसामान्य जनतेला न्याय देऊ शकत नाही. कारण, लोकनेत्यांच्या तुलनेत प्रशासकीय अधिकाऱ्यांचा जनतेच्या समस्यांशी संबंध खूपच कमी प्रमाणात येतो. त्यामुळे या निवडणुका होणे नितांत गरजेचे होते. आता टप्प्याटप्प्यात निवडणुका होणार आहे.



या निवडणुका आजी-माजी आमदारांची परीक्षा घेणाऱ्या ठरणार आहेत. त्यामुळे आजी-माजी आमदारांच्या हालचाली वाढल्या असून बुथनिहाय नियोजन केले जात आहे. नुकत्याच पार पडलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत जनतेने भाजपाला एकतर्फी कौल दिल्याने या पक्षाकडे स्थानिक निवडणुकांसाठीसुद्धा इच्छुकांच्या रांगा लागल्या आहेत. काँग्रेस पक्षाकडूनही अनेक जण इच्छुक असल्याने तिकीट वाटप करताना वरिष्ठांची कसोटी लागत आहे. अशातच समाजमाध्यमांवर मतचोरी आणि ईव्हीएममधील गडबडीचा फेक नॅरेटिव्ह विरोधकांकडून प्रसारित केला जात आहे. वास्तविक आजपर्यंत याबाबत विरोधक कायदेशीररीत्या कुठलाही ठोस पुरावा सादर करू शकलेले नाहीत. बिहार विधानसभा निवडणुकीतही असाच काहीसा प्रचार काँग्रेससह इतर पक्षांनी करून पाहिला. परंतु, जनता आता विरोधकांच्या खोट्या प्रचाराला कंटाळली आहे.

बिहारातील भाजपाचे अभूतपूर्व यश पाहून उबाठा नेते संजय राऊत खूपच अस्वस्थ झाल्याचे जाणवत आहे. उबाठाने आपले सर्व लक्ष मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीवर केंद्रित केले आहे. मुंबईतही उबाठाला धोबीपछाड बसल्यास या पक्षाचे अस्तित्वच धोक्यात येऊ शकते. सध्या सगळीकडे भाजपाच क्रमांक एकचा पक्ष असून त्यानंतर काँग्रेस आणि राकाँकडे बऱ्यापैकी जनाधार आहे. विदर्भात मात्र बहुतांश ठिकाणी भाजपा आणि काँग्रेस या दोनच पक्षांत थेट लढतीचे चित्र आहे. गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात खा. प्रफुल्ल पटेल यांच्यामुळे अजित पवारांच्या राकाँकडे बऱ्यापैकी जनाधार आहे. वर्धा जिल्ह्यात खा. अमर काळे आणि अतुल वांदिले यांच्यामुळे शरद पवारांच्या राकाँचे अस्तित्व आहे. विदर्भात उबाठाचे फारसे अस्तित्व नसून काही ठिकाणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उमेदवार रिंगणात दिसू शकतात.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये स्थानिक मुद्दे प्रामुख्याने प्रचारात येतात. परंतु, अलिकडील परिस्थिती पाहता या निवडणुकांमध्येसुद्धा राज्य आणि राष्ट्रीयस्तरावरील मुद्दे विचारात घेतले जाण्याची शक्यता आहे. तरीही बहुतांश ठिकाणी उमेदवारांची लोकप्रियता प्रभावी ठरू शकते. त्यामुळे उमेदवार देताना पक्षश्रेष्ठींचे कौशल्य पणाला लागत आहे. अनेक पक्षांमध्ये बंडखोरीचे प्रमाण अधिक राहणार असल्याने हा विषय वरिष्ठांच्या माध्यमातूनच मार्गी लावावा लागणार आहे. अन्यथा होतकरू उमेदवारांचे नुकसान होऊ शकते. आणखी दोन-तीन महिने संपूर्ण महाराष्ट्रात निवडणुकांचे वातावरण राहणार आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# दहशतवादाचा रक्तरंजित चेहरा

दहशतवादाचा कुठलाही धर्म नसतो हे कितीही कंठशोष करून काँग्रेस, पुरोगामी, कम्युनिस्ट हे सांगत असले तरीही, वारंवार देशामध्ये उरी, पठाणकोट, पुलवामा, संसद भवन, मुंबई बॉम्बस्फोट, दिल्ली बॉम्बस्फोट अशा अनेक घटनांमधून जनतेला ते समजून येतं की दहशतवादाचा धर्म कोणता आहे, प्रत्येक वेळेस यावर शिक्कामोर्तब होत असते.

फक्त मुस्लिम एकगठ्ठा मतदानासाठी हे नेते लोक अशा पद्धतीची विधाने करीत असतात. वास्तविक दहशतवाद्यांचा संपूर्ण मुस्लिम समाजाशी संबंध जोडणे म्हणजे शंभर टक्के मुस्लिम समाजावर अन्याय करण्यासारखे असू शकते. परंतु सर्व मुसलमान हे दहशतवादी नसले, तरी भारतामध्ये पकडले जाणारे सर्वच अतिरेकी हे मुस्लिम समाजाचे असतात हे सुद्धा सत्य आपण नाकारू शकत नाही.

मुस्लिम समाजात देशभक्त आणि चांगले लोक आहेत, परंतु त्यांची संख्या इतकी नगण्य आहे आणि त्यांचा कट्टरवादी समाज त्यांना किंमत देत नाही हे सुद्धा वास्तव आहे. जोपर्यंत तुम्ही इस्लामला न मानणाऱ्या प्रत्येकाला 'काफीर' समजत राहाल, तोपर्यंत सामाजिक एकता आणि राष्ट्रीय एकता निर्माण होऊ शकत नाही. कट्टरवादी विचारसरणीचे लोक हा मुस्लिम समाजामध्ये नियम आहे, अपवाद फक्त काही लोकांचा असतो. आज अमेरिका, इंग्लंड आणि विविध पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये सुद्धा मुस्लिम जनसंख्येचा विस्फोट आणि त्यांच्या कट्टरवादी कारवाया ही त्यांच्यासाठी चिंतेची बाब बनलेली आहे. भारतामध्ये तर पाकिस्तानची जेवढी जनसंख्या आहे, तेवढेच लोक राहत आहेत. काल काश्मिरातील नौगाम येथे ज्या पोलिस स्थानकामध्ये अमोनियम नायट्रेटचा जप्त केलेला साठा ठेवला होता, त्याच्या परीक्षणासाठी नमुने घेताना त्याचा विस्फोट झाला व त्यामध्ये अनेक लोकांचा नाहक बळी गेला. जशी अमोनियम नायट्रेटमध्ये स्फोट घडविण्याची क्षमता आहे, तशीच क्षमता या समाजाच्या लोकसंख्या विस्फोटामध्ये आहे. जोपर्यंत या समाजामध्ये अगदी लहान मुलांना देखील भारतविरोधाचे व कट्टरवादी विचारसरणीचे शिक्षण दिले जाईल, तोपर्यंत हेच लहान मुलं कधी सैन्यावर दगडफेक करतील, तर कधी दहशतवादाच्या विविध कारवायांमध्ये सामील राहतील. हे अडाणी राहिले, तर मानवी बॉम्ब बनतील; भंगार गाडीत बॉम्ब ठेवतील; इंजिनीयर राहिले, तर ओसामा बिन लादेन बनतील; आणि डॉक्टर बनले, तर डॉ. शाहीन, डॉ. मुजम्मिलसारखे बनतील. म्हणजे शिक्षण घेऊन त्यांच्यामध्ये देशभक्ती आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईलच असे सांगता येत नाही. एका अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थेमध्ये मला भाषण देण्याचा योग आला होता. आपल्याला माहीत आहे की एमबीबीएससाठी खूप जास्त टक्केवारी असल्याशिवाय प्रवेश मिळत नाही. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश हा केवळ फारच हुशार विद्यार्थ्यांसाठी असतो आणि त्याहीपेक्षा जास्त टक्केवारी ही एम्ससारख्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळविण्यासाठी लागत असते.

ज्या वेळेस भाषण द्यायला मी तिथे गेलो होतो, त्या वेळेस काही विद्यार्थिनी हिजाब बांधून बसलेल्या होत्या. हिजाब ही त्यांची धार्मिक प्रथा आहे. प्रत्येकाने त्याच्या धार्मिक प्रथा पाळायला संविधानाने अनुमती दिलेली आहे. फक्त यातून डॉ. शाहीनसारखी दहशतवादी जन्माला यायला नको हे बघितले पाहिजे. शाहीन फक्त डॉक्टर नव्हती, तर ती प्राध्यापक सुद्धा होती. लोकांचे प्राण वाचविण्यासाठी डॉक्टर बनणारा माणूस लोकांचे प्राण कसे घेऊ शकतो? असा भोळा प्रश्न भारतातील लोकांना पडू शकतो. परंतु लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की अनपढ असले, इंजिनीयर असले, डॉक्टर असले, तरीसुद्धा त्यांची विचारसरणी जर धार्मिक कट्टरवादाची असेल, तर यातून आतंकवादच जन्माला येईल आणि हेच सर्व घडलेले आहे. आजपर्यंत एक लाखापेक्षा अधिक माणसे या दहशतवादामध्ये मारली गेलेली आहेत, तरीसुद्धा महाराष्ट्रातील व देशातील पुरोगामी नेते, काँग्रेस, कम्युनिस्ट, हिंदूंचे बुद्धिभेद करणारे लोक हे दहशतवाद्यांचा मुस्लिम समाजाशी संबंध जोडू नये असे म्हणतात. शहाबानो खटल्यामध्ये ज्या वेळेला शहाबानोने पोटगी मागितली होती, त्यावेळेस राजीव गांधींच्या काँग्रेसला वाटले होते की शहाबानोला जर पोटगी दिली तर मुस्लिम समाज नाराज होईल आणि आमची गठ्ठा व्होट बँक आमच्यापासून दूर जाईल. काँग्रेसच्या याच मानसिकतेने काश्मिरातील हजरत बल दर्ग्यामध्ये लपलेल्या अतिरेक्यांना बिर्याणी खाऊ घातली आहे.

दहशतवादाविरुद्ध आम्ही काही बोललो, तर मुस्लिम समाज नाराज होईल अशा पद्धतीचा ग्रह आमच्या हिंदू पुढाऱ्यांचा असतो. परंतु एकीकडे तुम्ही म्हणता की दहशतवाद्यांचा मुस्लिम समाजाशी संबंध नाही, मग दहशतवाद्यांना बिर्याणी खाऊ घालण्यापेक्षा गोळ्या का घालत नाही? कारण दहशतवादी हे मुस्लिम समाजाचे असले तरी त्यांचा संपूर्ण समाजाशी संबंध जोडला जाऊ नये, असे तुम्हीच म्हणता. शहाबानोला पोटगी दिल्याने मुस्लिम समाज कसा नाराज होईल ही काँग्रेस, कम्युनिस्ट आणि हिंदू धर्मातील तथाकथित बुद्धिवादी नेत्यांची समाजाचा बुद्धिभेद करण्याची खेळी आहे. दहशतवादाचा हिरवा रंग दिल्लीच्या रस्त्यावर पसरलेला आहे. जोपर्यंत दहशतवाद्यांची लढाई केवळ सर्वसामान्य समाज सोबत राहील, तोपर्यंत दहा बळी गेले काय आणि ५० बळी गेले काय, कोणाला त्याचा फारसा फरक पडणार नाही. परंतु दहशतवाद्यांचे हे कृत्य, त्यांची ही लढाई भारतासोबत आहे, भारतीय संविधानासोबत आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. शांततेचा मार्ग सोडून समाजामध्ये अस्थिरता निर्माण करणे, लोकांचा जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेणे हे संविधानविरोधी आहे. असे कृत्य करणारे हे कुठल्याही विचारसरणीचे किंवा कुठल्याही धार्मिक विचारांचे असले तरी, परंतु त्यांची जागा तुरुंगातच असली पाहिजे. दहशतवादी आमच्या धर्माचे आहेत म्हणून कोणीही त्यांची पाठराखण करता कामा नये. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्या युद्धामध्ये लढणारे दोन्ही बाजूचे सैनिक मुसलमान आहेत. बलुचिस्तानमध्ये तेथील लोकांवर निर्दयी अत्याचार करणारे पण मुसलमान आहेत आणि अत्याचार सहन करणारे सुद्धा मुसलमान आहेत. अफगाणिस्तान पाकिस्तानातील सैनिकांना आपले शत्रू मानतो आणि बलुचिस्तानातील जनता पाकिस्तान आर्मीला आपला शत्रू मानते. ही शत्रू-मित्र परीक्षा आणि ओळख समाजाने सुद्धा कायम ठेवणे गरजेचे आहे. आतंकवादी हा आतंकवादीच आहे, तो इस्लामचा चेहरा नाही. त्याला गाडण्यासाठी कब्रस्तानामध्ये जागा सुद्धा दिली जाऊ नये. असे झाले तरच दहशतवाद पराभूत होईल. आणि मग दहशतवादाला हिरवा किंवा लाल रंग देण्याची आवश्यकता राहणार नाही.

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वाचक पत्रे

### सुरक्षा प्रथम, संधी सर्वांना

राजधानी दिलीतील लाल किल्ला परिसरात झालेल्या स्फोटामुळे संपूर्ण देश हादरला आहे. स्फोटात मोठी हानी टळली असली तरी, या घटनेने राष्ट्रीय सुरक्षेविषयी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. प्राथमिक चौकशीनुसार, या प्रकरणात मोठ्या प्रमाणावर स्फोटके, शस्त्रसामग्री आणि निधीचा समावेश असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सुरक्षा यंत्रणांनी या प्रकरणाचा सर्वंकष तपास करून दोषींवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. ही घटना केवळ दहशतवादी कटापुरती मर्यादित नाही, तर ती देशातील सुरक्षाव्यवस्थेतील काही कमकुवत बाजूंकडेही लक्ष वेधते. उच्चशिक्षित व्यक्तींमधूनही समाजविघातक कृती होत असल्याचे आढळते, हे चिंताजनक आहे. त्यामुळे शासनाने शिक्षण, शिष्यवृत्ती, स्पर्धा परीक्षा आणि प्रशासकीय नियुक्त्या यांसारख्या सर्व क्षेत्रांमध्ये सुरक्षा आणि पात्रतेचे निकष अधिक कडक करणे गरजेचे आहे.

सुरक्षा प्रथम, संधी सर्वांना या तत्त्वानुसार देशातील प्रत्येक नागरिकाला समान संधी मिळावी, पण त्या सोबत राष्ट्रीय सुरक्षेशी कोणतीही तडजोड होऊ नये, हे सरकारने सुनिश्चित करणे गरजेचे आहे. सर्व सवलती, योजना आणि सुविधा या पारदर्शक आणि सुरक्षा तपासणीच्या चौकटीतूनच राबवाव्यात. आज देशासमोर सर्वांत मोठे आव्हान म्हणजे आतून आणि बाहेरून होणाऱ्या कटांना थोपविणे. या घटनेतून आपण सावध होऊन राष्ट्रीय सुरक्षा यंत्रणा आणि धोरणे अधिक सक्षम करणे ही काळाची गरज आहे. दोषींना कठोर शिक्षा आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी ठोस उपाययोजना याच देशाच्या सुरक्षेचा पाया ठरतील.

**रमा देशमुख**/नागपूर

### जागृत गृहमंत्रालय

सध्या देशात नरसंहार घडविण्याचा घाट भारतातील काही देशद्रोही कंटकांनी उचलला आहे . गुजरात गृहमंत्रालयाने विषप्रयोगाला जायबंदी करून जागृतीची जाणीव इतर राज्यांना करून दिली आहे. विरोधी पक्ष मात्र भारतीय गृहमंत्रालयाला दिल्ली बॉम्बस्फोटाकरिता जबाबदार धरताना द्रोही नेटवर्कवर काहीच बोलत नाही! खरोखरच भारतीय गुप्तचर संस्था इतक्या मोठ्या लोकसंख्येवर लक्ष ठेवण्यासाठी पुरेशी आहे का? यावर विरोधी पक्षाने कधीतरी भाष्य का केले नाही? देशात शांतता राखण्यासाठी जेवढे सरकार जबाबदार आहे तेवढेच कर्तव्य लोकांचे नाही का? या देशाला लोकशाहीच्या नावाने जगात बदनाम करण्याचा एक नवे गोपनीय सूत्र वापरण्यात येत असेल तर गृहमंत्रालयाने त्यांचे हितचिंतक शोधून त्यांच्यावर कारवाई करणे गरजेचे आहे.

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

### मृतांचे आधार कार्ड नष्ट करणे गरजेचे

जेव्हा एखादी नवीन यंत्रणा किंवा पद्धत अस्तित्वात येते तेव्हा जसे फायदे असतात तसे तोटेही असतात. त्याच बरोबर दोषही येतात. तसेच काही आधारकार्ड मृतांच्या बाबतीत घडले आहे. आता यूएआयडीतर्फे महानगरपालिका, नगर परिषद, नगर पंचायत, ग्रामपंचायत यांना अशी व्यवस्था करून द्यावी की जेव्हा नागरिक मृत्यू दाखला घ्यायला येतो तेव्हा त्या मृत व्यक्तीचे आधार कार्ड जमा करून त्याचे आधार कार्ड नंबर त्याच वेळी रद्द करण्यात यावे व त्यानंतर मृत्यू दाखला देण्यात यावा व मतदार यादीतून त्याचे नाव देखील काढून टाकण्यात यावे. अशी व्यवस्था झाल्यास अवैध मतदान होणार नाही व आधारकार्डद्वारे फसवणूक होणार नाही.

**डॉ. जयंत ओक**/९७६४६४८३८३

## आजचे संघगीत-४९

सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५

### अब जाग उठो कमर कसो...

अब जाग उठो कमर कसो मन्झिल की राह बुलाती है
ललकार रही हम को दुनिया भेरी आवाज लगाती है ॥धृ॥

है ध्येय हमारा दूर सही पर साहस भी तो क्या कम है
हम राह अनेकों साथी है कदमों में अंगद का दम है
असुरों की लन्का राख करे वह आग लगाने आते है ॥१॥

पग पग पर काटे बिछे हुये व्यवहार कुशलता हम में है
विश्वास विजय का अटल लिये निष्ठा कर्मठता हम में है
विजयी पुरखों की परम्परा अनमोल हमारी थाती है ॥२॥

हम शेर शिवा के अनुगमी राणा प्रताप की आन लिये
केशव माधव का तेज लिये अर्जुन का शरसन्धान लिये
सन्गठन तन्त्र की शक्ती ही वैभव का चित्र सजाती है ॥३॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी बीड नगरपालिकेत उमेदवारांची गर्दी

## भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस अ.प., राष्ट्रवादी काँग्रेस श.प., एमआयएम, अपक्षांनी भरले नगराध्यक्षपदाचे उमेदवारी अर्ज







**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ नोव्हेंबर**

बीड नगरपालिकेच्या निवडणूक प्रक्रियेत आज प्रचंड हालचाल पाहायला मिळाली. नगरसेवक तसेच नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्याचा सोमवारी अंतिम दिवस असल्याने सकाळपासूनच नगरपालिकेत उमेदवार व कार्यकर्त्यांची झुंबड उडाली. अनेक इच्छुक उमेदवार एबी फॉर्मच्या प्रतीक्षेत ताटकळत बसलेले दिसले तर काही जण कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी धडपड करू लागले.यावेळी प्रशासनाचे काउंटर, पडताळणी कक्ष आणि नगरपालिका परिसरात दिवसभर गजबजून गेले होते.दरम्यान, काही पक्षांनी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जाहीर केल्याने त्यांच्या कार्यालयांत जल्लोष करण्यात आला.

भाजपकडून घुमरे, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून दैनिक सिटीजनचे संपादक मुजीब शेख यांची सासू प्रेमलता पारवे यांना अधिकृत उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. मात्र, राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून विष्णु वाघमारे यांच्या पत्नी यांना नगराध्यक्ष पदासाठी उमेदवार म्हणून घोषणा करण्यात आली तर भारतीय जनता पार्टीकडून डॉ.घुमरे यांच्या पत्नी यांना अध्यक्षपदाची उमेदवारी घोषित करण्यात आली. याच बरोबर काँग्रेस आय पक्ष, एमआयएएम, पोलिस बॉईज संघटनेकडून तोळणबाई गोरे यांच्यासह आदिंनी उमेदवारी अर्ज दाखल केले.

# प्रा.अशोक घोडके यांना पीएच.डी प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१७ नोव्हेंबर**

केज शहरातील सरस्वती महाविद्यालयातील ग्रंथपाल अशोक माणिकराव घोडके यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर विद्यापीठाने ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयात पीएच डी. प्रदान केली. या यशाबद्दल माऊली विद्यापीठाचे अध्यक्ष अशोकराव पाटील ,खा.रजनीताई पाटील, संस्थेचे सचिव आदित्य पाटील, प्रशासकीय अधिकारी प्रताप मोरे, सरस्वती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. बी. पाटील, डॉ.हनुमंत सौदागर, श्रीकांत लुंगारे, प्राध्यापक वृंद शिक्षणप्रेमी यांनी अभिनंदन केले आहे.

त्यांनी डॉ. दया पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील प्राध्यापकांच्या संशोधन कार्यात महाविद्यालय ग्रंथालयाचे योगदान एक अभ्यास या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.



# खंडोबाच्या दैवी तेजात उजळणार चंपाषष्ठी बीड खंडोबा दिपमाळ मंदिराची ऐतिहासिक यात्रा

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१७ नोव्हेंबर**

बीड जिल्ह्याचे आराध्य दैवत असलेल्या श्री खंडोबा दिपमाळ मंदिरात चंपाषष्ठी निमित्त २५ ते २६ नोव्हेंबर २०२५ या दोन दिवसीय भव्य यात्रा उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. श्रद्धाळूंच्या असंख्य आस्थास्थान असलेले हे देवस्थान आपल्या १७व्या शतकातील हेमाडपंथी दगडी बांधकाम, उंच दीपमाळ, तसेच प्राचीन परंपरांसाठी विशेष ओळखले जाते.



मंदिर परिसरातील दोन सुमारे ७० फूट उंच दीपस्तंभ हे या ठिकाणचे प्रमुख वैशिष्ट्य असून, यात्रेच्या काळात त्यावरील दीपप्रज्वलन हा भक्तांसाठी आध्यात्मिक आनंदाचा सोहळा ठरतो. गाभाऱ्यातील मार्तंड-भैरव स्वरूपातील खंडोबा हे शौर्य, संरक्षण व धर्मसंस्थापनेचे प्रतीक मानले जाते.

चंपाषष्ठी हा दिवस मल्ल-मणी राक्षसांचा संहार करून धर्मरक्षण केल्याच्या ऐतिहासिक पौराणिक स्मृतीशी जोडलेला आहे. त्यामुळे या दिवशी अभिषेक, दिपदान, काठीपूजन, पालखी सोहळा, जागरण-गोंधळ आणि रथप्रदक्षिणा अशा पारंपरिक धार्मिक कार्यक्रमांना विशेष महत्त्व असते.

या यात्रेनिमित्त मंदिर संस्थानतर्फे

- विशेष महापूजा व अभिषेक,
- भजन-कीर्तन व जागरण-गोंधळ,
- भव्य पालखी व रथप्रदक्षिणा,
- तसेच महाप्रसाद, रक्तदान शिबीर, आरोग्य तपासणी, स्वच्छता उपक्रम

यांचे आयोजन करण्यात आले आहे.

या दिव्य उत्सवात मोठ्या संख्येने उपस्थित राहून यल्ला मल्लारी, जय खंडोबा जयघोषात दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री खंडोबा देवस्थान संस्थानतर्फे करण्यात आले आहे.

श्री खंडोबा दीपमाळ मंदिर संस्थानतर्फे भक्तांच्या सोयीसाठी आणि या पवित्र ऐतिहासिक मंदिराच्या जतनासाठी अनेक विकासकामे सुरू केली आहेत. संपूर्ण विकास आराखडा तयार असून अल्प पूर्तता बाकी आहे; ती पूर्ण झाली तर मंदिराचा विकास वेगाने पुढे जाईल. मात्र पुरातत्व विभागाच्या अडमुठ्या भूमिकेमुळे आणि स्थानिक प्रशासनाच्या उदासीनतेमुळे शतकानुशतकांच्या परंपरेचे हे देवस्थान अनावश्यक अडथळ्यांना सामोरे जात आहे. देवस्थानाचा विकास हा कोणाच्याही अहंकाराचा बळी ठरू नये-यासाठी आम्ही अपेक्षित सहकार्याची तीव्र मागणी करतो.

– रामनाथ खोड, कोषाध्यक्ष, श्री खंडोबा दीपमाळ मंदिर संस्थान, बीड

# भव्य शक्तिप्रदर्शन करत लोकविकास महाघाडीच्या सर्व उमेदवारांचे उमेदवारी अर्ज दाखल करताना निघालेल्या रॅलीने शहराचे वातावरण निघाले ढवळून

**न भूतो न भविष्यती असा मतदारांचा विश्वास घेऊन राजकिशोर मोदी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी आपले उमेदवारी अर्ज केले दाखल**

**लोकविकास आघाडीचे जोरदार शक्तिप्रदर्शन पाहून विरोधकांचे धाबे दणाणले**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१७ नोव्हेंबर**



अंबाजोगाई नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणूकीच्या नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याचा शेवटच्या दिवशी लोकविकास महाआघाडीच्या नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व पंधरा प्रभागातील ३१ उमेदवारांनी अंबाजोगाई शहरात जोरदार शक्तिप्रदर्शन करत आज सोमवार दि १७ रोजी आपले नामनिर्देशन अर्ज दाखल केले. मागील ९ वर्षांपासून अंबाजोगाई नगर परिषदेची निवडणूक झालेली नाही. त्यामुळे नगर परिषदेवर प्रशासक राज होते. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे लोकप्रतिनिधीचा नगर परिषदेवर अंकुश नव्हता. राज्य निवडणूक आयोगाने नुकताच नगर परिषदेच्या निवडणूक कार्यक्रम जाहिर केला असून सोमवार दि १७ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता.

नामनिर्देशन दाखल करण्याचा अंतिम दिवशी राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व समविचारी पक्षाची लोकविकास महाआघाडी निर्माण करून या आघाडीचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार राजकिशोर मोदी व आघाडीचे सर्व ३१ उमेदवार यांनी आज आपले नामनिर्देशन दाखल केले. अंबाजोगाई शहरातुन काढलेल्या महाघाडीच्या महारॅलीने शहराचे संपूर्ण वातावरण ढवळून निघाले होते. या महारॅलीमध्ये हजारोच्या जनसमुदाय सहभागी झाला होता. यामध्ये नवयुवक , महिला, तसेच जेष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला. हे वातावरणात पाहून महाआघाडीचे सर्वेसर्वा राजकिशोर मोदी, नानासाहेब गाठाळ, माजी आमदार पृथ्वीराज साठे, बबनराव लोमटे , डॉ नरेंद्र काळे, महेंद्र निकाळजे, दीपक कांबळे, हाजी महमूद, खालेद चाऊस यांच्यासह महाआघाडीचे नगरसेवक पदाचे सर्व उमेदवार हे भाराहून गेल्याचे दिसून येत होते. रॅलीची सुरुवात ही गुरुवार पेठ येथील जोधाप्रसादजी मोदी विद्यालयापासून निघून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे, सदर बाजार, मोची गल्ली, गांधी नगर , मंडी बाजार , पाटील चौक , मंगळवार पेठ , वीर सावरकर चौक बस स्थानक मार्गे नगर परिषद कार्यालयापर्यंत येऊन सर्व उमेदवारांच्या नामनिर्देशन अर्ज दाखल करण्याने संपन्न झाली.



भव्य अशा या महारॅलीच्या माध्यमातून राजकिशोर मोदी यांच्यावरील मतदारांचे प्रेम व जिव्हाळा तसेच यातून आगामी निकालाची झलक देखील दिसून आली. यामुळे विरोधी गटाच्या पायाखालची वाळू सरकू लागल्याचे स्पष्ट संकेत पहावयास मिळत आहेत.लोकविकास महाआघाडीच्या माध्यमातून अंबाजोगाई शहरात नवनवीन विकासाच्या संकल्पना राबविण्यात येणार असल्याचा संकल्प राजकिशोर मोदी व त्यांच्या सर्व सहकारी उमेदवारांनी केला आहे. कोणतीही तयारी किंवा नियोजन नसतांना सुद्धा मतदार इतक्या उत्स्फूर्तपणे सहभागी झाला होता यामध्ये एकही व्यक्ती ग्रामीण भागातील नव्हता हे विशेष म्हणावे लागेल.

# भाजपचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार गोपीनाथ गडावर नतमस्तक ना. पंकजाताई मुंडे यांनी दिल्या सर्वांना शुभेच्छा !

## संपूर्ण ताकदीनिशी विजयश्री खेचून आणण्याचा केला निर्धार

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१७ नोव्हेंबर**



भारतीय जनता पक्षाच्या नगराध्यक्ष पदासाठी रिंगणात उतरलेल्या जिल्ह्यातील सर्व उमेदवारांनी आज गोपीनाथ गडावर येऊन लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सर्व उमेदवारांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

नगरपरिषद निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. जिल्ह्यातील सहा पैकी पाच ठिकाणी भाजपचे उमेदवार रिंगणात उतरले आहेत तर परळीत महायुतीचा उमेदवार आहे. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार डॉ ज्योती घुंबरे (बीड), नंदकिशोर मुंदडा (अंबाजोगाई), गीता भाभी पवार (गेवराई), रामचंद्र निर्मळ (धारूर), संध्या मेंडके (माजलगांव) यांनी सायंकाळी गोपीनाथ गडावर येऊन लोकनेते मुंडे साहेबांच्या समाधीचे दर्शन घेतले. यावेळी ना. पंकजाताई मुंडे यांचे सर्व उमेदवारांनी निवडणूकीत संधी दिल्याबद्दल आभार मानले. ना. पंकजाताईंनी देखील सर्वांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या. नगरपरिषद निवडणूकीत सर्व जागांवर संपूर्ण ताकदीनिशी विजयश्री खेचून आणण्याचा निर्धार याप्रसंगी उमेदवारांनी केला. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, माधव निर्मळ, रूपाली कचरे, विनायक रत्नपारखी, ज्ञानेश्वर मेंडके आदींसह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

# राम कोकीळ यांचेकडून श्री संस्कार इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१७ नोव्हेंबर**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील श्री संस्कार इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांना सोमवारी सकाळी राम कोकीळ यांचे कडुन शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.




याविषयी सविस्तर वृत्त असे की चिंचोली माळी येथील रहिवासी व सध्या पुणे येथे यशस्वी उद्योजक म्हणून परिचित असलेले राम कोकीळ यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत व शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रेरणा मिळावी या उदात्त हेतूने व आपल्या भागातील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा सुधारला पाहिजे या उद्देशाने तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देणाऱ्या श्री संस्कार इंग्लिश स्कूल मधील सर्व शिक्षीकांना व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले.यावेळी बोलताना राम कोकीळ यांनी श्री संस्कार इंग्लिश स्कूल बद्दल गौरवोद्गार काढले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी पांडुरंग गलांडे सर, श्री संस्कार एज्युकेशन ग्रुप चे अध्यक्ष अनिल गलांडे, प्रिन्सीपल, संचालक अमोल गलांडे यांच्यासह सर्व शिक्षीका व शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल गलांडे यांनी केले तर सूत्रसंचालन आरती आचार्य यांनी केले व आभार प्रदर्शन प्रिन्सीपल सिमा फुटाणे यांनी केले.

DNS Bank Ltd. Ambajogai
ISO 9001:2008 Certified Bank.
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई

( Secured Creditor as defined u/s 2(1)(zd) of SARFAESI Act,2002)

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र. सरफेसी/१५/७००२-२५/१८१/२०२५-२६ दिनांक १७.११.२०२५

**नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे**

प्रति,
१. मे. माऊली एस.टी. उपहार गृह प्रोप्रा. कृष्णा नामदेवराव शेळके (कर्जदार)
**पत्ता:-** माऊली एस.टी.उपहार गृह, बस स्टॅण्ड, पाचोड, ता.पैठण, जि.छत्रपती संभाजीनगर ४३१ १२१
२. श्री. मुरलीधर मच्छींद्रनाथ झिने
**पत्ता:-** शिवछत्रपती कॉलेज, पाचोड, ता.पैठण,जि.छत्रपती संभाजीनगर ४३१ १२१
३. श्री. उमाकांत चंद्रकांत भोसले
**पत्ता:-** शिवछत्रपती कॉलेज, पाचोड, ता.पैठण,जि.छत्रपती संभाजीनगर ४३१ १२१

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

**सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,
**विषय:-** नॉन-परफॉमिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- **छत्रपती संभाजीनगर**
**सुचना:-** U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. तुमचे कर्जखाते दिनांक **२२.०६.२०२५** पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
| --- | --- | --- |
| **खाते क्र. ७००२ -२५ रु.१५,००,०००/-** | कर्जदार कृष्णा नामदेवराव शेळके यांची मौजे पाचोड, ता.पैठण, जिल्हा छत्रपती संभाजीनगर येथील ग्रामपंचायत घर क्र.२८१ प्लॉट क्षेत्र १०५० स्वे.फु. आणि बांधकाम क्षेत्र १०५० स्वे.फु. ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:- **चतु:सिमा सेल डीड प्रमाणे:-** **पुर्व** :- रस्ता **पश्चिम:-** रस्ता **दक्षिण** :- खुली जागा **उत्तर** :- खुली जागा **चतु:सिमा प्रत्यक्षात/मुल्यांकन:-** **पुर्व** :- रस्ता **पश्चिम:-** रस्ता **दक्षिण** :- कचरु गवारे यांची जागा **उत्तर** :- एकनाथ धारकर यांची जागा | कर्जखाते क्र.७००२-२५ मुद्दल + व्याज एकुण रु.१४,३४,८१२/-दिनांक ३१.१०.२०२५रोजी + पुढील व्याज @ १२.००% दिनांक ०१.११.२०२५ पासुन |

- **वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा**
- **अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही**

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक २४.०५.२०२४
ब. गहाणखत नोंदणी दिनांक २४.०५.२०२४ (गहाणखत नोंदणी क्र.४१५५/२०२४)

५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. **कर्जखाते क्र.७००२-२५ मुद्दल + व्याज एकुण रु.१४,३४,८१२/-दिनांक ३१.१०.२०२५रोजी + पुढील व्याज @ १२.००% दिनांक ०१.११.२०२५ पासुन** आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक १८.०१.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

**ठिकाण:- अंबाजोगाई**

**श्री.अनंत गोपाळराव देशपांडे**
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सह.बँक म.अंबाजोगाई
मुख्यालय-अंबाजोगाई मो.७६६६५७७९००

# डॉ. ज्योती बनसुडे यांचा अर्ज दाखल

## औशात भाजपा उमेदवारांचे शक्तीप्रदर्शन



**त.भा. वृत्तसेवा,**

**औसा, १७ नोव्हेंबर :** औसा नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी एमआयएम, उबाठा शिवसेना, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस व भारतीय जनता पक्षाने फटाक्याची आतिषबाजी करीत वाजत गाजत शक्तीप्रदर्शनातून अखेरच्या दिवशी आ. अभिमन्यू पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत नगराध्यक्षपदासाठी डा. ज्योती बसुडे यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी माने, औसा मंडळध्यक्ष शिव मुरगे, माजी उपमहापौर देवीदास काळे, संतोष मुक्ता, बंडू कोद्रे, किरणं उटगे, ॲड. मुक्तेश्वर वागधरे, ॲड. अरविंद कुलकर्णी, गिरीश पाटील, किरण उटगे, सुनील मिटकरी, कल्पना डांगे, सौ. शोभाताई अभिमन्यू पवार, प्रा सुधीर पोतदार, ॲड. परिक्षीत पवार, हाणमंत राचट्टे, शाम भोसले, लहू कांबळे, विनोद जाधव, दत्ता पुंड, शंकर पुंड, वसीम मुनीर आली सय्यद, अक्रम पठाण सह विविध पक्षांचे आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमुळे वातावरणात उत्साह आणि जोश ओसंडून वाहत होता. हनुमान मंदिर परिसरातून निघालेल्या भव्य शक्ती प्रदर्शनाने शहराचे लक्ष वेधून घेतले. ढोल-ताशांच्या जोरदार निनादात, कमळाच्या झेंड्यांनी सजलेल्या रॅलीत शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले. महिला, युवक आणि ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी दिलेल्या उपस्थितीमुळे रॅली अधिक दमदार आणि आकर्षक बनली होती.

# महिला अत्याचार विरोधात जनजागृती रॅली

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १७ नोव्हेंबर :** फलटण येथील महिला डॉक्टरने केलेल्या आत्महत्या प्रकरणातील आरोपीना शिक्षा झाली पाहिजे या मागणीसह महिलांवरील वाढत्या अत्याचाराच्या निषेधार्थ रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल व इनरव्हील क्लबसह अन्य सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमानाने शहरातून रॅली काढण्यात आली.

उदगीर शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये रोटरी क्लब ऑफ उदगीर सेंट्रल, इनरव्हील क्लब उदगीर, स्वामी विवेकानदं महाविद्यालय उदगीर, मातृभूमी महाविद्यालय उदगीर, स्त्री रोग डॉक्टर असोसिएशन उदगीर, धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालय उदगीर आदी संस्थांचे पदाधिकारी व विद्यार्थिनी सहभागी झाले होते. या महिला अत्याचार विरोधात रॅलीमध्ये विद्यार्थी, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरीकानीं उत्साहाने सहभाग नोंदवला.

सकाळी ८:१५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौकातून रॅलीला सुरूवात झाली. सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी हातात फलक, बॅनर घेत महिला सुरक्षा आणि समानतेचे संदेश दिले. आंबेडकर चौकात समारोप कार्यक्रमात वक्त्यानीं कडक कायदे, समाजातील जागरूकता आणि सामुहिक जबाबदारीची गरज असल्यावर भर दिला. तसेच महिलासाठी सुरक्षित वातावरण




उदगीर येथे रोटरी क्लब, इनरव्हील क्लबसह अन्य सामाजिक संस्थाचा पुढाकार

निर्माण ही समाजाची सामुहिक जबाबदारी असल्याचे सांगितले.

या रॅलीमध्ये रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रशांत मांगुळकर, उपाध्यक्ष मोतीलाल डोईजोडे, सचिव विक्रम हालकीकर, महानंदा सोनटक्के, मंगला विश्वनाथे, ज्योती चौधरी, रजनी उस्तुरे, व्ही. एस. कणसे, चंद्रकांत ममदापुरे, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा पल्लवी मुक्कावार, कोषाध्यक्ष स्वाती गुरुडे, माजी अध्यक्षा मीरा चंबुले, रोहिणी चाटे, डॉ. प्रियंका राठोड, डॉ. सुप्रिया जगताप, भाग्यश्री स्वामी, अंबिका बावगे, डॉ. सुप्रिया सोनटक्के, डॉ. दीपिका कल्पे, पूजा मोगले, पूजा मुडपे, कल्पना पिंगळे, कविता डोंगरगे, स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या प्राचार्या ज्योती स्वामी, ज्योती तारे, प्रा. नागसेन तारे, प्राचार्य फ्लरे, मातृभूमी महाविद्यालयाच्या प्राचार्या उषा कुलकर्णी उस्तुरे, नेहा वाघमारे, प्रतीक्षा काकरे, मिरा बिरादार, उषा सताळकर, ओंकारे जगदीशा यांच्यासह स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ नर्सींग, चे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व मातृभूमी महाविद्यालय, उदगीर, मातृभूमी नर्सिंग स्कूल, उदगीर कस्तुराबाई नर्सिंग स्कूल,उदगीरच्या विद्यार्थीनी, शिक्षक, शिक्षक उपस्थित होते.

# यशवंत विद्यालयात जनजागृती रॅली

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १७ नोव्हेंबर :** येणाऱ्या नगर परिषद निवडणूक २०२५ साठी अहमदपूर शहरातील दोन डिसेंबर रोजी होणाऱ्या नगरपरिषद निवडणुकीसाठी मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी वाढावी म्हणून यशवंत विद्यालय अहमदपूर येथून दि.१५ ऑक्टोबर रोजी सकाळी १०:४५ वा अहमदपूर शहरात भव्य दिव्य स्वरुपात रॅली काढून मतदार जनजागृती करण्यात आले.

अहमदपूर सार्वत्रिक नगर परिषद निवडणुकीत मतदारांनी १००% मतदान करुन मतदानाचा टक्का वाढवावा यासाठी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगरकर, गटशिक्षणाधिकारी बबनराव ढोकडे, केंद्रप्रमुख प्रमुख कासार, नायब तहसीलदार संजय भोसीकर, मुनवर मुजावर, नायब तहसीलदार नामदेव अर्जुने यांच्या आदेशाने स्वीपचे सदस्य महादेव खळुरे, शिवकुमार गुळवे, मोहन तेलंगे, बसवेश्वर थोटे, विवेकानंद बंडे, यशवंत शाळेचे मुख्याध्यापक गजानन शिंदे, उपमुख्य माधव वाघमारे, रामलिंग तत्तापूरे, प्रा. विश्वंभर स्वामी, डॉ. बालाजी कारामुंगीकर, संतोष पारशेट्टे, सचिन लांडगे यांच्यासह विद्यालयाचे शेकडो विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. मतदार रॅलीचे उद्घाटन मुख्याध्यापक गजानन शिंदे यांनी हिरवा झेंडा दाखवून केला.

## मतदार राजा जागा हो.. लोकशाहीचा धागा हो! या घोषवाक्याने शहर दुमदुमले



# आजचे बालक उद्याचे भविष्य घडवतील : बनशेळकीकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १७ नोव्हेंबर :** आजचे बालक हे उद्याचे भविष्य घडवतील, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक रमाकांत बनशेळकीकर यांनी केले. ते जिव्हाळा ग्रुप उदगीरच्या वतीने देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विश्वनाथराव बिरादार माळेवाडीकर यांनी भूषविले.

या कार्यक्रमात सचिव डॉ.अशोकराव दारनुळे व शरणप्पा खेळगे यांचा वाढदिवसानिमित्त तर जिव्हाळा ग्रुपचे अध्यक्ष दशरथराव शिंदे अपघातानंतर बरे झालेबद्दल जिव्हाळा ग्रुपच्या वतीने सत्कार केला. याप्रसंगी देविदासराव नादरगे व जिव्हाळा ग्रुप चे उपाध्यक्ष अशोकराव बिरादार यांनी मनोगत व्यक्त केले. जिव्हाळा ग्रुपचे समन्वयक प्रा. डॉ. अनिल भिकाने यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन केले. चंद्रकांत रोडगे यानी आभार मानले.

कार्यक्रमास लक्ष्मीकांत बिडवई, मनोहर कुलकर्णी, डॉ. रमेश बिरादार, सोपानराव माने, रामराव मोमले, वैजनाथराव पंचगल्ले, शंकरराव साबणे, विठ्ठलराव फुलसे, अमृतराव देशपांडे, विक्रम हालकीकर, दिलीप कंधारे, मोहनराव खिंडीवाले, हरिश्चंद्र वट्टमवार, बाबुराव वाघमारे, हावगीराव आचारे, चंद्रकांत उप्परबावडे, चंद्रकांत पांचाळ, सचिन बापूरे आदी उपस्थित होते.

# उदगीर बसस्थानकाचे काम रखडले

## एसटी महामंडळाचे दुर्लक्ष : प्रवाशांना करावा लागतोय गैरसोयीचा सामना

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १७ नोव्हेंबर :** या शहरात मोठ्या प्रमाणावर शैक्षणिक संस्था तसेच व्यापारी बाजारपेठ आहे. त्यामुळे या बसस्थानकातून प्रवाशांची संख्या लक्षणीय आहे. उदगीर आगाराचे वार्षिक उत्पन्नही चांगले आहे. अद्ययावत सुविधा असलेले बसस्थानक असणे गरजेचे असल्याने तत्कालीन आमदार सुधाकर भालेराव यांच्या कार्यकाळाच्या शेवटच्या टप्प्यात ४ कोटी ५० लाख रुपयांचा कामाचे भूमिपूजन झाले होते. मात्र, प्रत्यक्ष काम सुरू झाले नाही. सत्ता बदलल्यानंतर विद्यमान आमदार संजय बनसोडे यांच्या कार्यकाळात दुसऱ्यांदा उद्घाटन होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली.

तथापि, गुत्तेदाराच्या निष्काळजीपणामुळे काम कधी बंद, तर कधी सुरू राहून त्यात मोठा विलंब झाला. अनेकवेळा गुत्तेदार बदलले गेले, परंतु बराच काळ उलटूनही




आजही काम अर्धवट अवस्थेत आहे. उदगीरसोबत इतर बसस्थानकांची कामे पूर्ण झाली, मात्र उदगीरकडे कायम दुर्लक्षच राहिले आहे. निधी देण्यात दुजाभाव होत असल्याचे चित्र दिसून येते, तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनाही यात यश मिळत नाही. त्यामुळे अनेक दिवसांपासून रखडलेले बसस्थानक केव्हा पूर्ण होणार याकडे प्रवाशांचे लक्ष लागले आहे.

> उदगीर बसस्थानकाचे बेसिक काम पूर्ण झाले आहे. गुत्तेदाराला एवढ्याच कामाचे टेंडर देण्यात आले आणि ते पूर्ण झाले आहे. यानंतरच्या कामासाठी नव्याने प्रस्ताव पाठवला असून, मंजुरीनंतर टेंडर प्रक्रिया पूर्ण झाल्यावर पुढील काम सुरू होईल.
>
> **-जगदीश कोकाटे,** अभियंता

# नगराध्यक्ष १४, तर नगरसेवक पदासाठी २४० अर्ज दाखल

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १७ नोव्हेंबर :** राज्यात होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक संदर्भात अहमदपूर नगर परिषद निवडणूक साठी १० नोव्हेंबर पासून नामनिर्देश पत्र स्वीकारण्यास सूर झाल्या नंतर पाहिले तीन-चार दिवस इच्छुक उमेदवार प्रतिसाद मिळाला नाही.

१२ प्रभागातून २५ नगरसेवक आणि नगराध्यक्ष साठी महाविकास आघाडी एकत्र लढणार असल्याचे आधीच स्पष्ट झाले. पण महायुतीमध्ये राष्ट्रवादी व भाजपमध्ये शेवटच्या दिवसापर्यंत सूत न जमल्याने आज १७ तारीख अर्ज भरण्याच्या शेवट ला राष्ट्रवादीतर्फे अभय बळवंतराव मिरकले यांनी अर्ज सादर केला. तर भाजपसाठी ॲड. स्वप्नील महारुद्र व्हत्ते यांनी अर्ज भरला असल्याची माहिती समोर येत आहे. महाआघाडीचे उमेदवार विलास शेटे यांनी माजी मंत्री विनायकराव पाटील, शिवसेना जिल्हाध्यक्ष बालाजी रेड्डी व भारतीय काँग्रेस तालुकाध्यक्ष चंद्रकांत मद्दे यांच्या मार्गदर्शनाखाली मिरवणूक काढून अर्ज दाखल केला.

राष्ट्रवादीचे राज्याचे महसूलमंत्री बाबासाहेब पाटील व माजी आमदार बब्रुवान खंदाडे, गणेश हाके, अशोक केंद्रे, दिलीपराव देशमुख, ॲड. भारत चामे यांच्यात युती संदर्भात चर्चा असफल झाल्याने निवडणूक मात्र अटीतटीची होणार आहे.

# मुले हे उद्याच्या देशाचे आधारस्तंभ असतात : विलास चापोलीकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १७ नोव्हेंबर :** मुले हे उद्याच्या देशाची आधारस्तंभ असतात असे प्रतिपादन यशवंत प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विलास चापोलीकर यांनी केले.

अधिक माहिती अशी की येथील यशवंत प्राथमिक शाळेत बाल दिनाचे औचित्य साधून ईनरव्हील क्लबच्या वतीने मुलांना कपड्याचे वाटप करण्यात आले. त्यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विलास चापोलीकर हे अध्यक्षीय स्थानावरून बोलत होते. यावेळी मंचावर ईनरव्हील क्लबच्या अध्यक्षा अडव्होकेट पूजा वैभव रेड्डी, सेक्रेटरी रजनी महाजन, ट्रेझरर पल्लवी हेंगणे, आयएसओ कलावती भातांब्रे, पास्ट प्रेसिडेंट सुनिता गुणाले, कांचन काडवादे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना बिलाचा प्ले कर म्हणाले की, समोर बसलेल्या विद्यार्थी विद्यार्थ्यांमध्ये उद्याचा मुख्यमंत्री उद्याचा मंत्री उद्याचा डॉक्टर उद्याचा इंजिनीयर उद्याचा वकील असू शकतो अर्थात ही मुले उदयाच्या देशाचा आधारस्तंभ असून यांच्या शिक्षणावर अधिकाधिक खर्च होणे आवश्यक आहे कारण यांच्यावरच उद्याचा भारत देश अवलंबून आहे. आज भारत देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती असून आजचा दिवस देशभर बालदिन म्हणून साजरा केला जातो.

नेहरूजींना मुले आणि फुले खूप आवडत होती. तेव्हा या मुलांच्या शिक्षणावर अधिकाधिक खर्च होऊन त्यांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक सर्व प्रकारचा विकास होणे आवश्यक आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वसंत बिराजदार यांनी तर तर उपस्थित आमचे आभार किरण आष्टे यांनी मानले सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सोपान बडगिरे, पी.पी. मोरे, बाळासाहेब करंजकर आदींनी परिश्रम घेतले.

# उदगीर तालुका सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेची कार्यकारिणीची स्थापना

**त.भा. वृत्तसेवा,**

**उदगीर, १७ नोव्हेंबर :** आज दिनांक १७-११-२०२५ रोजी शामलाल सार्वजनिक वाचनालय उदगीर येथे सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या कर्मचारी व पदाधिकारी यांची बैठक सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे मुख्य संघटक विद्यासागर हणमंते यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली.

सदर बैठकीसाठी मराठवाडा विभाग कार्याध्यक्ष मनोहर गायकवाड, निळकंठ होनमोडे, विधीज्ञ सल्लागार विजय बिराजदार यांच्या उपस्थितीत संपन्न झाली.



यावेळी अध्यक्ष- सुर्यकांत जगताप, पंचाक्षरी स्वामी, उपाध्यक्ष- सौ.रेखा लाला, सचिव, सौ. उर्मिला शेळगे, सहसचिव- सौ. अर्चना बिराजदार, कोषाध्यक्ष-रत्नदिप ढवळे, सदस्य-सौ. प्रतीक्षा शंबाळे, सदस्य-संतोष चव्हाण, सदस्य, सौ. शालूबाई बिराजदार, सौ. गंगासागर सुरनर, मन्सूर तांबोळी, भरत सुर्यवंशी वरील प्रमाणे उदगीर तालूका कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

११ डिसेंबर रोजी नागपूर येथे विधानभवनावर काढण्यात येणाऱ्या मोर्चात सहभागी होण्यासाठी आव्हान करण्यात आले. प्रस्ताविक विजय बिराजदार यांनी, आभार नागनाथ बिराजदार यांनी केले.

# बिरसा मुंडा यांच्यामुळे झाली आदिवासींना आत्मसन्मानाची जाणीव : डॉ. सूर्यवंशी




**त.भा. वृत्तसेवा,**

**अहमदपूर, १७ नोव्हेंबर :** भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतिकारी सैनिक, आदिवासींचे महानायक तथा जननायक बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजामध्ये केलेले सामाजिक सुधारणा, शिक्षण, स्वच्छता असे महत्त्वाचे कार्य याबरोबरच आमची जमीन आमचे राज्य ही बिरसा मुंडा यांची प्रेरणादायी हाक यामुळे आदिवासींना खरी आत्मसन्मानाची जाणीव झाली असे मत डॉ यादव सूर्यवंशी यांनी 'जनजातीय गौरव दिवस' कार्यक्रमात व्यक्त केले.

२०२५ हे जननायक बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष असून, बिरसा मुंडा यांची जयंती 'जनजातीय गौरव दिवस' म्हणून साजरी करण्यात येत आहे. यानिमित्त येथील महात्मा गांधी महाविद्यालयात बिरसा मुंडा जीवन आणि कार्य या विषयावर डॉ यादव सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले.

याप्रसंगी त्यांनी बिरसा मुंडा यांचे धनुर्धारी आदिवासी नेतृत्व, ब्रिटिशांच्या जुलमी सत्तेविरुद्ध त्यांनी घडवून आणलेला उलगुलान (महा उठाव), आदिवासी समाजातील विविध सुधारणा व त्यांच्या कल्याणासाठी त्यांनी केलेल्या कार्यावर यथोचित प्रकाश टाकला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. त्यांनीही आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये बिरसा मुंडा यांच्यासारखे निर्भय व कणखर व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी डॉ. डी.एल. बंजारा, प्रा. डी.जी. पुरी. प्रा. ए.टी. दाभाडे, जी.एस. गवळी, जी.एस. तलवारे, आर.डी. राजमल्ले, शंकर शेळके, दीपक दुर्गे, मंदे अमरनाथ, धुळगंडे विनीत, मुकनर सानिया, अंकिता कांबळे, खुणे ऐश्वर्या, केंद्रे शिल्पा यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# सोनाबाई रावण कोनाळे यांचे निधन

**त.भा. वृत्तसेवा,**

**देवणी, १७ नोव्हेंबर :** देवणी तालुक्यातील तळेगाव भोगेश्वर येथील रहिवसी सोनाबाई रावण कोनाळे यांचे



दि.१६ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५:३० च्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्या ७५ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पार्थिवावर दि.१७ नोव्हेंबर रोजी ११:०० वाजता तळेगाव भोगेश्वर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, चार मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे.

## संक्षिप्त वृत्त...

### श्री.शनि महाराज देवघर पालम येथे कार्यक्रम उत्साहात संपन्न



**पालम,/प्रतिनिधी :** श्री सदगुरू बाळकृष्ण गोशाळा तथा श्री शनी महाराज देवघर पालम येथे दि.१६ नोव्हेंबर रोजी भारतीय जनता पार्टी जिल्हा सरचिटणीस परभणी आकाशभाऊ लोहट यांच्या वाढ दिवसाच्या निमित्त लोहट यांच्या वतीने श्रीशनी महाराज देवघर तथा श्री सदगुरू बाळकृष्ण गोशाळा पालम येथे गुरुवर्य श्री देविदासगुरु जोशी पालमकर यांच्या मंत्रोच्चार तथा आशीर्वाद मंत्राद्वारे महाआरती करण्यात आली तथा गोपूजन करण्यात आले यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य लिंबाजीराव टोले किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष परभणी भरतराव जाधव भाजपा पप्पूभाऊ मोटे,ओम प्रकाश जवळकर,अनंतजी कोते,चंद्रकांतजी आवंके भाजपा पालम तालुका उपाध्यक्ष मधुकरराव रोकडे,भाजपाचे दत्तराव घोरपडे,रामदास नाईकवाडे,मंगेशभाऊ जोंधळे संतोष रत्नपारखी मिटूदेवा देशपांडे यांच्या वतीने आकाशभाऊ लोहट यांचा वाढदिवस श्री शनी महाराज देवघर तथा श्री सदगुरू बाळकृष्ण गोशाळा पालम येथे संपन्न झाला यावेळी उपस्थितांचे आभार अविनाश जोशी यांनी मानले.

### प्रभाग क्रमांक ११ मध्ये डॉ. देवयाणी राजेश्वर दहे यांचा उमेदवारी अर्ज दाखल.



**मानवत,/प्रतिनिधी :** प्रभाग क्रमांक ११ मध्ये डॉ. देवयाणी राजेश्वर दहे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे. मानवत नगर परिषदेच्या निवडणूकीत नगर सेवक पदासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रभाग क्रमांक ११ मध्ये सर्वसाधारण महिला उमेदवार म्हणून डॉ. देवयानी राजेश्वर दहे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी आप्तगण उपस्थित होते.आज पर्यंत अध्यक्ष पदासाठी ०२ अर्ज दाखल झाले असून सदस्य पदासाठी ८१ उमेदवारांनी आपले निवडणूक अर्ज भरले आहे. प्रभाग ११ मध्ये डॉ. देवयाणी दहे यांच्या उमेदवारी मुळे निवडणूक चूरसीची होण्याचे संकेत जाणकार व्यक्त करीत आहे.

### नगराध्यक्षपदासाठी काँग्रेसकडून उमेदवारी दाखल



**गंगाखेड,/प्रतिनिधी :** नगराध्यक्ष निवडणुकीत आज काँग्रेसच्या वतीने उजमामाईण युनूस शेख यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. या प्रसंगी काँग्रेस तालुकाध्यक्ष गोविंद यादव, जेष्ठ नेते बाबुराव गळाकाटू, शहराध्यक्ष युनूस शेख, युवक काँग्रेसचे सिद्धोधन भालेराव, माजी नगरसेवक महेबुबभाई, दत्तराव भीसे, शिवाजी घोबाळे, नगरसेवक पदाचे उमेदवार डिगंबर यादव, ॲड. लिंबाजी घोबाळे, आकाश मोटे, तबरेज आलम आदिंसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.




**पाथरी:-राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष पदा साठी अन्सारी मोईज मास्टर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी आ राजेश दादा विटेकर, दादासाहेब टेंगसे,संजय कुलकर्णी, बीडकर आदी पक्षाचे नेते, कार्यकर्ते दिसत आहेत.**

# पालकमंत्री मेघना बोर्डीकर साकोरे यांनी आडगाव बाजार येथील लाईटचा प्रश्न मार्गी लावला

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील आडगाव बाजार येथील ३३ केवी वीज केंद्र वर जास्त लोड येत असल्यामुळे परिसरातील सर्व शेतकऱ्यांना वारंवार होणाऱ्या ट्रीप मुळे व कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्याने शेती चे अतोनात नुकसान होत होते व शेतकऱ्याचे हाल होत होते यावर अनेक वेळा प्रश्न उचलून देखील परिस्थितीत कोणताच बदलना झाल्यामुळे आडगाव बाजार येथील चेअरमन श्री प्रल्हाद रामकिशनराव दाभाडे यांनी शासनाला आडगाव बाजार येथील तेहतीस किवी वर एक नवीन अकरा किवीचा डीपी लावण्याची मागणी केली.

परंतु या प्रश्नाकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे दिनांक २६ जानेवारी २०२३ रोजी ११ केवीसाठी आत्मदहनाचा इशारा दिला परंतु शासनाने हस्तक्षेप करून एका वर्षात प्रश्न मार्गी काढतो म्हणून २०२४ रोजी आत्मदहनाचा इशारा देऊन सर्व जनतेसमोर व शेतकऱ्यांसमोर ३३ केवी वर आत्मदान करण्याचा प्रयत्न केला परंतु प्रशासनाने मध्यस्थी करून लेखी स्वरुपात मागणी मांडणी केली व लवकरच ११ केवी मंजूर करण्यात येईल असे लेखी स्वरूपात आश्वासन दिले त्यानंतर आत्मदहन थांबविण्यात आले.

दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रशासनाने ११ केवी मंजूर करून डीपी आडगाव बाजार येथे ३३ वर आणण्यात आला आज प्रल्हाद दाभाडे यांनी केलेले अतक परिश्रमातून ११ केवी आडगावला आल्यामुळे परिसरातील सर्व शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे दाभाडे यांनी केलेले आत्मदहन इशारा यश प्राप्त झाल्याची सर्वत्र चर्चा आहे आडगाव येथील शनिवारी दुपारी ते तिसगाव डीपी बसवण्यात आला आहे या डीपी बसवल्यामुळे आडगाव बाजार येथील नागरिकांनी पालकमंत्री तथा राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांचे आभार मानले व तसेच



## प्रभाग १२ मधून भाजपाचे दोन उमेदवार मैदानात हाजी शेख अथर महंमद नुर व पठाण महेमुन्ननिसा बेगम यांनी दाखल केला उमेदवारी अर्ज

**जिंतूर,/प्रतिनिधी :** जिंतूर नगरपरिषद निवडणुकीत भारतीय जनता पक्षाने उमेदवारांची निवड प्रक्रिया वेगात सुरू केली असून प्रभाग क्रमांक १२ (अ) आणि १२ (ब) मधील उमेदवारांची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. या दोन्ही उमेदवारांनी आज आपले नामनिर्देशन अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी शैलेश लाहोटी यांच्या समक्ष दाखल केले.

घोषित उमेदवार
प्रभाग क्रमांक १२ अ : हाजी शेख अथर महंमद नुर
प्रभाग क्रमांक १२ ब : पठाण महेमुन्ननिसा बेगम फायजखान

भाजपाच्या स्थानिक संघटनेत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला असून दोन्ही उमेदवारांची निवड अधिकृतरीत्या निश्चित झाली आहे. बोर्डीकर यांचा मजबूत गड प्रभाग १२
प्रभाग क्रमांक १२ हा भाजपाचे ज्येष्ठ नेते मा. रामप्रसाद बोर्डीकर व परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचा मजबूत प्रभावक्षेत्र मानला जातो. या पार्श्वभूमीवर या प्रभागातील उमेदवारांना मोठ्या प्रमाणात पक्षकार्यकर्ते व स्थानिक समर्थकांचे पाठबळ लाभत आहे.




निवडणूक अर्ज दाखल करताना उत्साहपूर्ण वातावरण नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यासाठी दोन्ही उमेदवार मोठ्या समर्थक ताफ्यासह तहसील कार्यालयात दाखल झाले. या वेळी वातावरणात उत्साह आणि घोषणा-पत्रे गुंजत होती.

उमेदवारांसोबत उपस्थित असलेल्यांमध्ये हाजी शेख अथर शेख नूर, राजेश वैष्णव, टीकाखान पठाण, शेख मोहम्मद मजर, माजी नगरसेवक मन्सूर भाई, मोसीन पठाण, खालेद चाऊस, बासुलाला पठाण, शेख आखील, जाबेर भाई, सिराज सिद्दीकी, मेराज कुरेशी तसेच प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

स्थानिक राजकारणात उत्सुकता शिगेला
प्रभाग १२ हे दोन विभागांमध्ये विभागल्याने या वेळी स्पर्धा अधिक रोचक होणार असल्याचे राजकीय वर्तुळातून बोलले जात आहे. भाजपाच्या उमेदवारांच्या प्रवेशामुळे या प्रभागातील निवडणूक अधिक चुरशीची होण्याची शक्यता आहे.

## शिवसेना(शिंदे गट)तर्फे वट्टमवार यांचा नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी मोठी राजकीय हालचाल पाहायला मिळाली. शिवसेना (शिंदे गट)तर्फे राजेश वट्टमवार यांनी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी दाखल करून निवडणुकीच्या रिंगणात अधिकृत प्रवेश केला आहे. उमेदवारी दाखल करण्यासाठी पक्षाचे ज्येष्ठ पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष म्हणजे, शिवसेना (शिंदे गट)चे जिल्हाध्यक्ष आनंद भरोसे यांनी स्वतः हजर राहून वट्टमवार यांच्या उमेदवारीला पाठिंबा दर्शवला. राजेश वट्टमवार यांनी नगरपरिषदेत पारदर्शक कारभार, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सुधारित व्यवस्था, रस्त्यांचे मजबुतीकरण आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी उपयुक्त योजना राबविण्याचे आश्वासन व्यक्त केले. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाकडून अधिकृत दिशादर्शन मिळाल्याने या उमेदवारीमुळे नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत नवा राजकीय कलाटणी येण्याची शक्यता व्यक्त होत आहे. शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट), भाजप आणि काँग्रेस या पक्षांकडून उमेदवारांची नोंद झाल्याने जिंतूरमधील निवडणूक चुरशीची होण्याची चिन्हे आणखी स्पष्ट झाली आहेत. अंतिम उमेदवारांची छाननी आणि त्यानंतर समितीने जाहीर होणाऱ्या वैध उमेदवारी यादीकडे सर्वांचे लक्ष केंद्रीत आहे.






**परभणी- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या पिपल्स एज्युकेशन सोसायटी ला ५०० कोटी रुपयांचा निधी दिल्याबद्दल राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठी यांचा परभणी येथे ॲड. मोती शिंदे यांनी पिपल्स एज्युकेशन सोसायटी संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध फोटो एकत्रीत करुन बनवलेला फोटो त्यांना भेट देवून त्यांचा सत्कार केला. या प्रसंगी आनंद भरोसे, संतोष गुजर, सुधीर साळवे आदी दिसत आहेत छाया- रवि मानवतकर, परभणी.**

## सेलू ते कोळवाडी व पेठशिवणी ते सेलू या रस्त्याची दुरवस्था

**शांतीलाल शर्मा**

**पालम,/प्रतिनिधी-** सेलु ते पेठशिवणी तसेच अनेक गावाला जोडणारा रस्ता आसुन कोळवाडी ते सेलू या रस्त्याची बिकट अवस्था झाली आहे. याकडे मात्र प्रशासनाला व लोकप्रतिनिधी याचे लक्ष नाही.या करीता रस्त्याचे काम नाही झाले तर येणाऱ्यां स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये वेगळे पडसाद उमटल्या शिवाय राहणार नाहीत अशी देखील चर्चा नागरीकातुन चर्चा ऐकवयास मिळत आहे. निवडणुका जवळ आल्या की लोकप्रतिनिधी विकास कामांचे आश्वासन देतात परंतु निवडणुका झाल्या की दिलेले आश्वासन विसरून जातात या पुर्वि जिल्हा परिषद सदस्य निवडून आले मात्र त्यानी दुर्लक्ष केल्या मुळे जवळपास तीन दशका पासून या रस्त्याकडे बिकट आवस्ता आहे.



पेठशिवाणी सेलू , पेंडू, वानवाडी अशा वेगवेगळ्या गावांना जोडणाऱ्या रस्त्यावर टाकली मटरेल देखील उचलून घेऊन गेले आहेत. या करीता आमदार डॉ.रत्नाकराव गुट्टे यांनी विशेष लक्ष देऊन हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे.

## राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)तर्फे भव्य शक्ती प्रदर्शन; सबिया बेगम कफिल फारूकी यांनी नगराध्यक्ष पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट)ने आज भव्य शक्ती प्रदर्शन करत नगराध्यक्ष पदासाठी अधिकृत उमेदवारी दाखल केली. पक्षाच्या वतीने सबिया बेगम कफिल फारूकी यांनी सभाशोधनात मोठ्या समर्थकांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

उमेदवारी दाखल करण्यासाठी सकाळपासूनच कार्यकर्त्यांची आणि समर्थकांची मोठी गर्दी शहरातील महत्त्वाच्या मार्गांवर दिसून आली. पक्षाच्या झेंड्याने सजवलेल्या वाहन रॅलीसह नेते, पदाधिकारी व महिला कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी दाखल कार्यक्रम उत्साहात पार पडला. डीजे पथक, ढोल-ताशांच्या गजरात पक्षाच्या घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला. यावेळी पक्षाचे स्थानिक पदाधिकारी, युवानेते, महिला आघाडीच्या कार्यकर्त्यांनी सबिया बेगम फारूकी यांना शुभेच्छा देत आगामी निवडणुकीत पक्षाला भरघोस यश मिळेल असा विश्वास व्यक्त केला.




नागरिकांशी संवाद साधताना सबिया बेगम यांनी शहरातील मूलभूत सुविधा, पाणीपुरवठा, महिलांच्या सुरक्षेसह सर्वसमावेशक विकासाचे आश्वासन दिले. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या या उमेदवारी आणि शक्ती प्रदर्शनामुळे शहरातील निवडणूक वातावरणात आणखी रंग चढला असून इतर पक्षांच्या पॅनेलवरही याचा थेट परिणाम दिसत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. जिंतूर नगरपरिषद निवडणुकीसाठी आता सर्वच पक्षांनी आपली मोर्चेबांधणी वेगाने सुरू केली असून, उमेदवारी अर्ज दाखल प्रक्रियेला गती आल्याने निवडणुकीचे वातावरण तापले आहे.

## त्या तरुणाचा विहीरीत पडून मृत्यू

**पालम,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील पिंपळगाव तांडा येथे रविवारी (दि. १६) सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास कापूस वेचण्यासाठी शेतात गेलेल्या १९ वर्षीय तरुणीचा विहिरीत पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली.

पायल रोहिदास राठोड (वय १९) असे मयत तरुणीचे नाव आहे. सकाळी नेहमीप्रमाणे ती शेतात कापूस वेचण्यासाठी गेली असता अचानक ती विहिरीत पडली. घटनेची माहिती मिळताच बामणी पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. विहिरीत पडलेल्या पायलला बाहेर काढण्यासाठी जिंतूर नगरपरिषदच्या अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. पथक प्रमुख सी. पी. राठोड यांच्या नेतृत्वाखाली फायरमन बी. एस. रोकडे, एस. आर. भवाळे, राठोड तसेच वाहनचालक रवि पवार यांनी रेस्क्यू ऑपरेशन पूर्ण केले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधींची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# हिंगोलीत नगर पालिका निवडणुकीसाठी अर्ज दाखल करण्यासाठी उमेदवारांची गर्दी

## शिवसेना शिंदे गट, भारतीय जनता पक्ष, उबाठा तसेच राष्ट्रवादी अजित पवार गटांसह दिग्गजांनी भरले अर्ज





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ नोव्हेंबर**
हिंगोली नगर पालिकेच्या निवणुकीसाठी सोमवारी अर्ज भरण्याची शेवटची तारखी असल्यामुळे सर्वच पक्षांच्या उमेदवारांनी त्यांच्या समर्थकांसह उमेदवारी अर्ज भरण्यासाठी गर्दी केली होती. यावेळी काहीकाळ अधिकारी आणि उमेवारांमध्ये शाब्दीक चकमक उडाली परंतु नंतर शांतपणे अर्ज दाखल करून घेण्यात आले. दुपारी ३ वाजेपर्यंत उमेवारांनी अर्ज दाखल केले आ-हेत. या निवडणुकी महायुती न झाल्यामुळे भारतीय जनता पक्ष, शिंदे शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या उमेदवारांनी स्वतंत्रपणे अर्ज दाखल केले आहेत. तर महाविकास आघाडीमधून नगराध्यक्षपदासाठी उबाठा शिवसेनेच्या अर्चना श्रीराम भिसे यांनी त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.
भारतीय जनता पक्षाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे यांच्या उपस्थितीमध्ये नगराध्यक्षपदासाठी नीता बांगर यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे. तर शिंदे शिवसेनेच्यावतीने आ. संतोष बांगर, माजी सभापती श्रीराम बांगर यांच्या उपस्थितीमध्ये सौ रेखा श्रीराम बांगर यांचा नगराध्यक्षपदासाठी अर्ज भरण्यात आला आहे. अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, उपनगराध्यक्ष शेख निहाल यांच्या उपस्थितीत अमीना बी यांचा नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. तर महाविकास आघाडीच्यावतीने सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे यांच्या उपस्थितीमध्ये अर्चना श्रीराम भिसे यांनी नगराध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.
या नगर पालिका निवडणुकीत अनेक दिग्गजांनी निवडणुकीच्या तोंडावर पक्षांतर केले आहे. त्यामुळे आता निवडणुकीत खिचडी झाली असून मतदारही आता संभ्रमात पडले आहेत.
या निवडणुकीत दिग्गजांमध्ये माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी नगराध्यक्ष जगजीतराज खुराणा, माजी उपनगराध्यक्ष शेख निहाल, माजी उपनगराध्यक्ष बिरजू यादव, माजी नगरसेवक शंभुसिंह गहिलोत, माजी नगरसेवक राजेश गोटे, माजी नगरसेवक बंडू कुटे आदींनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.
शेवटपर्यंत महायुती न झाल्याने हिंगोली नगर पालिकेत शिंदेसेना, भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटाचे उमेदवार आमनेसामने येणार आहेत तर महाविकास आघाडी एकत्र जरी असली तरीही काँग्रेस आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गट प्रचारामध्ये कमी पडत असल्याच दिसत आहे. अनेक ठिकाणी महाविकास आघाडीला उमेदवारांची कमतरता जाणवत असल्याच दिसत आहे. त्यामुळे खरी लढत शिंदेसेना, भाजप राष्ट्रवादी अजित पवार गट आणि उबाठा शिवसेना यांच्यातच होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

## राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहरातून मोठे शक्तीप्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ नोव्हेंबर**
महायुती न झाल्यामुळे हिंगोली नगर पालिकेत शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी अजित पवार गटाच्यावतीने नगराध्यक्षपदासाठी मोठे शक्तीप्रदर्शन करीत शहरात भव्य रॅली काढीत नगराध्यक्ष पदासाठी अमीना बी अजीज प्यारेवाले यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत अधिकच चुरस निर्माण झाली आहे.
हिंगोली नगर पालिका निवडणुकीत यावेळी शेवटच्या क्षणापर्यंत महायुती न झाल्यामुळे भारतीय जनता पक्ष, शिंदे शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट यांनी नगराध्यक्षपदासाठी उमेदवार दिला आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीने उबाठा शिवसेनेच्या अर्चना श्रीराम भिसे यांचा एकमेव अर्ज दाखल केला आहे.
हिंगोली नगर पालिका निवडणुकीत माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांनी त्यांच्या काळात केलेली विकास कामे जनतेसमोर ठेवली आहेत. नगराध्यक्षपदसाठी त्यांच्या पत्नी नीता बांगर यांना निवडणुकीत उतरवले हे. भारतीय जनता पक्षाची शहरात चांगली पकड आहे परंतु दुसरीकडे शिंदे शिवसेनचे आ. संतोष बांगर यांनी मागील एक वर्षापासून हिंगोली नगराध्यक्षपदासाठी त्यांचे भाऊ श्रीराम बांगर यांना नगराध्यक्षपदी विराजमान करण्यासाठी प्रयत्न चालविले होते परंतु ऐनवेळी नगराध्यक्षपदाची जागा ही ओबीसी महिलासाठी राखीव झाल्यामुळे त्यांनी रेखा श्रीराम बांगर यांना निवडणुकीत उतरवले आहे.
राष्ट्रवादी अजित पवार गटाने अखेरच्या दिवशी अचानक नगराध्यक्षपदासाठी अमीबा बी अजीज प्यारेवाले यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला.यावेळी मोठे शक्तीप्रदर्शन करण्यात आले. या रॅलीमध्ये माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, जिल्हाध्यक्ष बी डी बांगर माजी उपनगराध्यक्ष शेख निहाल यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी झाले होते. अर्चना श्रीराम भिसे आणि अमीनाबी प्यारेवाले यांच्या उमेदवारी अर्जामुळे नगराध्यक्षदाच्या निवडणुकीत आता चांगलीच चुरस निर्माण झाली असून विविध तर्कवितर्क लावले जात आहेत.



**हिंगोली- नगर पालिका निवडणुकीचा उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी राष्ट्रवादी अजित पवार गटाच्यावतीने नगराध्यक्षपदासाठी अमीना बी अजिज प्यारेवाले यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासठी शहरातून भव्य रॅली काढीत शक्तीप्रदर्शन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, जिल्हाध्यक्ष बी डी बांगर माजी उपनगराध्यक्ष शेख निहाल यांची उपस्थिती होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### नागनाथाला ४ किलो चांदीचा मुखवटा अर्पण



हिंगोली- औंढा नागनाथ येथील आठवे ज्योतिर्लिंग नागनाथ प्रभूस हैदराबाद येथील भाविक रमेश काचम यांनी चार किलो चांदीचा मुखवटा किंमत सहा लाख ५० हजार रुपयांचा अर्पण केला आहे. काचम कुटुंबीय मुख्य पुजारी हरिहर भोपी यांचे यजमान आहेत.यावेळी नागनाथ देवस्थान कडून काचम कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रमेश काचम, सपना काचम, हरीसाई काचम, भावना काचम, हरीकृष्णा काचम या भाविकांचा नागनाथ देवस्थानकडून शाल श्रीफळ व नागनाथ मंदिराची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, मुख्यपुजारी हरिहर भोपी, तुळजादास भोपी, कृष्णा पाटील दसरथ राठोड बबन सोनूने नागेश माने सुरेखा शिंदे नंदा चौढेकर, देवा देशमुख आदी उपस्थित होते.

## सुकळी बुद्रुक येथील उबाठा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ नोव्हेंबर**
हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे विकास शील कार्यावर विश्वास ठेवून तसेच शिवाजी मुटकुळे व विजय धाकतोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुकळी (बु) तालुका सेनगाव येथील उबाठा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश केला आहे.
यावेळी सरपंच व उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, गावकरी मंडळी यांनी उबाठा मधून भाजपमध्ये प्रवेश घेतला. याप्रसंगी सतीश पाचपिले सरपंच, देविदास कराळे उपसरपंच, रामदास पाचपिल्ले ग्रामपंचायत सदस्य, बद्री धाकतोडे, जगनराव काळबांडे, भागवत गायकवाड, शंकरराव कराळे, बबन कराळे, राजेश पाचपिले, सुरेश पाचपिल्ले, राजेश धाकतोडे, रामा पाचपिल्ले, लक्ष्मण तांबिले, संतोष पाचपिल्ले, अशोकराव पाचपिल्ले, विश्वनाथ पाचपिल्ले, नवनाथ धाकतोडे आदींची उपस्थिती होती.

## जिल्हास्तरीय युवा महोत्सवाला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ नोव्हेंबर**
जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाच्या वतीने येथील कै. शिवाजीराव देशमुख सभागृहात दि. १४ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या महोत्सवाचे उद्घाटन डॉ. विजय निलावार यांच्या हस्ते दीप प्रज्ज्वलन करुन करण्यात आले.
यावेळी राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त एम. एम. राऊत, प्रा. डॉ. सुधीर वाघ, प्रा.आनंद गायकवाड, जिल्हा क्रीडा पुरस्कार्थी शिवाजी इंगोले, सहायक माहिती अधिकारी चंद्रकांत कारभारी, जिल्हा क्रीडा अधिकारी आर. एस. मारावार आदी उपस्थित होते.
युवक व युवतींचा राष्ट्रीय जडणघडणात महत्त्वाचा वाटा असून, युवक व युवतीने युवा महोत्सवाच्या माध्यमातून हिंगोली जिल्ह्याचा नावलौकीक कमवावा, असे आवाहन डॉ. निलावार यांनी उद्घाटन प्रसंगी केले. याप्रसंगी बोलताना सहायक माहिती अधिकारी चंद्रकांत कारभारी यांनी क्रीडा व युवक संचालनालयाच्या वतीने आयोजित युवा महोत्सवामुळे युवांना आपल्या कलागुणांना वाव मिळवून देण्यासाठी संधी प्राप्त झाली आहे. युवक-युवतींनी कार्यक्रमाच्या माध्यमातून कलागुणांचे चांगले प्रदर्शन करावे, असे सांगून युवा महोत्सवात सहभागी युवक-युवतीला शुभेच्छा दिल्या.
प्रास्ताविकात जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार यांनी युवकांचा सर्वांगीण विकास व्हावा, संस्कृती व परंपरा जतन करणे, युवकांच्या अंगी असलेल्या सुप्त कलागुणांना वाव देणे, त्यांना एक खुले व्यासपीठ उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती दिली.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सिंधुताई दहीफळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन क्रीडाधिकारी प्रविण कोंडेकर यांनी मानले.

## आदिवासी विद्यार्थ्यांनी शिक्षणासाठी मोबाईलचा सकारात्मक वापर करावा- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ नोव्हेंबर**
भगवान बिरसा मुंडा यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकत आदिवासी विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून पुढे जावे. यासाठी विद्यार्थ्यांनी मोबाईलचा सकारात्मक वापर करून अभ्यास व पुस्तके वाचण्यावर भर द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी याप्रसंगी केले. तसेच 'आदि कर्मयोगी अभियान'अंतर्गत राज्य व देश पातळीवरील यशाबद्दल त्यांनी प्रकल्प अधिकारी डॉ. सुनिल बारसे तसेच या अभियानात योगदान देणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.
कळमुनरी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या वतीने हिंगोली येथील जिल्हा नियोजन समिती सभागृहामध्ये भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त आज भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
या कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन व दीपप्रज्वलन करुन करण्यात आले.
यावेळी प्रकल्प अधिकारी डॉ. सुनिल बारसे, सहायक प्रशासन अधिकारी आर.एस. भडके, आर. एल. भोसले, डी.यु. भानापुरे, लेखा अधिकारी कपिल पर्वे, ओ. एस. फड (सं.स.), 'उगम'चे जयाजी पाईकराव, सिरळीच्या अनुदानित आश्रमशाळेचे अध्यक्ष श्री. देशमुख उपस्थित होते.
या कार्यक्रमात 'आदि कर्मयोगी अभियान'मध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यामध्ये जे.आर. सानप, विलास राठोड, स्वाती किर्तनकार, बालाजी काळे, अरविंद सुर्यवंशी यांचा सत्कार करण्यात आला. तसेच भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल दिलीप महाजन यांचाही सन्मान करण्यात आला.
यावेळी आदिवासी समाजातील शासकीय सेवेत नव्याने रुजू झालेल्या कर्मचाऱ्यांचा आणि जिल्ह्यातील १० वी व १२ वीमध्ये विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. अनुदानित आश्रमशाळा सिरळी येथील ३५ आदिवासी विद्यार्थिनींनी फक्त १५ मिनिटांत भागवत कथा लिहिण्याचा विक्रम केला असून त्याची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये झाली आहे. या सर्व ३५ विद्यार्थिनींचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.
कार्यक्रमाच्या समारोपात आपल्या भाषणातून डी. यु. भानापुरे यांनी कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या विद्यार्थी, पालक, अधिकारी-कर्मचारी तसेच कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतलेल्या सर्वांचे आभार मानले.

## हातमाली येथे जिजाऊ ब्रिगेडची ग्रामशाखा स्थापन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १७ नोव्हेंबर**
जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने येथे प्रदेश उपाध्यक्षा ज्योतीताई कोथळकर व विभागीय सचिव अर्चनताई मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली हातमाली येथे शाखा स्थापन करण्यात आली आहे.
यावेळी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्षा प्रियंकाताई भोयर यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामशाखा स्थापन करण्यात आली. ग्रामशाखेच्या नुतन कार्यकारिणीमध्ये अध्यक्षा रंजना खंदारे, उपाध्यक्षा रंजना भिसे, उपाध्यक्षा सुमनबाई भोयर, सचिवपदी सुनिता भोयर, सहसचिवपदी सिंधू भोयर कार्याध्यक्षपदी कल्पना जाधव, सहकार्याध्यक्ष लता भोयर, कोषाध्यक्ष प्राजंली भोयर, सहकोषाध्यक्ष अर्चना भोयर व अनुसया भोयर, मार्गदर्शक अनुसया भोयर, प्रचार प्रसार प्रमुखपदी मिनाक्षी भोयर व सुशिला भोयर, प्रवक्ता कमल भोयर, सहप्रवक्ता अनुसया भोयर, सदस्य म्हणून ममता भोयर, कमल भोयर, अश्विनी सुक्ते, लता सुक्ते, गोदावरी भोयर, जना भोयर, मिना भोयर, शितल भोयर, छाया भोयर, वर्षा अंभोरे यांची नियुक्ती करुन नुतन पदाधिकार्यांचा सत्कार करण्यात आला. या बैठकीत चंद्रपूर अधिवेशनाबाबत माहिती देण्यात आली. तसेच संघटनेच्या वाटचाली वर प्रकाश टाकण्यात आला. तळागाळातल्या महिलांपर्यंत पोहचण्यासाठी जिजाऊ ब्रिगेड सतत कार्यशील राहिल असा विश्वास ज्योती कोथळकर यांनी व्यक्त केला. यावेळी अश्विनी भोयर, अनुसया भोयर, सुशिला अंभोरे, गंगुबाई सुक्ते, नंदिनी ढुक्के, सुमन भिसे, चंद्रभागा भोयर, ज्योती राऊत, अर्चना मोरे इ.महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.